VP0052

अच्युत पटवर्धन : आंतरिक वैचारिक वाटचालीचा आलेख

वसंत पळशीकर

साने गुरूजींच्या 'साधने'त मी अच्युतजींना प्रथम 'पाहिलं': त्यांच्या व्याख्यानांच्या वृत्तांसोबत त्यांचा एक फोटो प्रसिध्द होत असे. त्यांचे व्यक्तित्व करडे, धारदार व रुबाबदार असावे हे ठसत असे. तो फोटो आजही मला चांगला आठवतो. त्यावेळी ते समाजवादी पक्षाचे एक प्रमुख पुढारी म्हणून राजकारणात सक्रीय होते.

'साधने'चा वाचक असूनही, किंवा गुरूजींची ओळख, राष्ट्र सेवा दलाच्या १९५१ सालच्या उन्हाळ्यातील नेरळ येथील श्रमदान शिबिरातील सहभाग, अण्णासाहेब सहस्रबुध्दे यांच्या बरोबर त्यांचा लेखनिक म्हणून सहा महिने राहण्याचा योग, अशा घटना नंतरच्या काळात घडूनही वेचाळीसच्या ऑगस्ट क्रांतीचे हिरो ही अच्युतजींची प्रतिमा माझ्या मन:पटलावर खोलवर कोरली गेली नाही. लहानपणी सेवा दलात माझे जाणे झाले नाही त्याचा हा परिणाम असावा, प्रत्यक्ष चळवळीच्या काळात मी वयाने फारच लहान होतो.

अण्णासाहेबांबरोबर काम करीत असताना, १९५३ सालच्या हिवाळ्यात, वाराणसीच्या स्टेशनावर एकदा अच्युतजी अण्णांना भेटण्यासाठी गाडीवर आले होते. अच्युतजींचे ते माझे पहिले दर्शन. बेचाळीसच्या चळवळीत अण्णा अच्युतजींच्या सहकाऱ्यांपैकी एक होते. वयाने अण्णा मोठे; पण चळवळीच्या काळातले आपले नेते म्हणून अण्णा त्यांच्याशी वागताना मी पाहिले. अच्युतजींच्या वागण्याबोलण्यात त्या जुन्या संबंधाची जाण असली तरी नेतेपणाचा भाव लेशमात्रही नव्हता.

वाराणसीला अच्युतजींकडे जाऊन राहावे असे कोणी मला सुचवले आज मला आठवत नाही. पण सगळ्या गोष्टी अगदी सहजपणे जुळून आल्या आणि १९५४ च्या उत्तरार्धातील ४/५ महिने मी अच्युतजींजवळ राहिलो. त्यांना काही लेखन करावयाचे होते, आणि लेखनिक म्हणून मी ते उतरवून घ्यावे अशी कल्पना. लेखनाला प्रवृत्त करील अशा प्रकारची चर्चा त्यांच्या बरोबर करण्याइतका मोकळेपणा मला वाटला नाही, आणि तो माझ्या स्वभावाचाही भाग नसावा. ते काही असो, अच्युतजींच्या हातून काही लेखन झाले नाही. अच्युतजींच्या सहवासाच्या अपूर्व संधीचा मला लाभ उठवता आला नाही. वाचणे, विचार करणे, पत्र लिहिणे अशा माझ्याच उद्योगात व जगण्यात मी पूर्णपणे गुंतलेलो, व गुरफटलेलो होतो. कृष्णमूर्ती फाऊंडेशनच्या शिक्षणसंस्थांच्या कारभारातील जबाबदारी पार पाडण्यात, आणि तेथे फाऊंडेशनजवळ असलेल्या जमिनीवर शेतकी प्रशिक्षण शाळा उभारण्यात अच्युतजी त्यावेळी गुंतलेले होते.

बेचाळीसचा लढा, समाजवादी पक्ष व राजकीय जीवन यापासून निवृत्ती या विषयांवर त्यांना मी प्रश्न विचारले असते तर त्यांनी मोकळेपणाने उत्तरं दिली नसती असं नाही; मोकळेपणाने ते बोललेही असते. मलाच फारसे कुतूहल नव्हते.

जे. कृष्णमूर्तींना मी प्रथम तेथेच पाहिले, व त्यांची प्रवचने पण ऐकली. रावसाहेब पटवर्धन यानांही तिथेच, त्या दिवसांमध्ये प्रथम पाहिले. कृष्णमूर्तींना मी ऐकले; त्यांच्या मांडणीने मी प्रभावितही झालो. गोष्टींच्या मुळाशी ते जाऊन भिडतात व गाभ्याच्या सत्यावर पांघरूण घालणारी आवरणे कठोरपणे, कशाचा व कोणाचाही मुलाहिजा न बाळगता दूर करीत जातात, ही गोष्ट माझ्यापर्यंत पोचली. प्रवचनानंतरच्या प्रश्नोत्तरांच्या वेळी ते जी प्रश्नकर्त्याच्या मानसाची चिरफाड करीत ती ऐकण्यासारखी होती. अच्युतजी कृष्णमूर्तींच्या अंतर्वर्तुळातील एक आहेत ही गोष्ट तेव्हाही ध्यानात आली. पण कृष्णमूर्तींच्या मांडणीबद्दलही त्यांना छेडावे, खुलासे करून घ्यावेत असे मला वाटले नाही.

ज्या कामासाठी मी तेथे गेलो होतो ते काम सुरूच झाले नाही. त्या कामाच्या दृष्टीने मी लायक नाही असेही अच्युतजींच्या लक्षात आले असेल! पण नुसतेच तेथे किती राहावयाचे याला मर्यादा होती. १९५४ च्या अखेरीस मी वाराणसी सोडली.

पण योग असा की १९५६ ते ५८ ही दोन वर्षे इंग्रजी 'भूदान' साप्ताहिकाच्या कामात मदतनीस म्हणून रावसाहेब पटवर्धनांच्या हाताखाली काम करीत असताना पटवर्धन कुटुंबाशीच जास्त जवळचा संबंध जुळून आला. नंतरच्या काळात तो वेगवेगळ्या कारणांनी जास्त दृढ बनत गेला. साहाजिकच अधूनमधून अच्युतजींच्या भेटी होत राहिल्या. प्रसंगाने त्यांचे बोलणे ऐकण्याचाही योग येत गेला. त्यापेक्षा वेगवेगळ्या संदर्भात त्यांचे दर्शन घडत गेले. दोनचार वेळा त्यांच्या व्याख्यानांचे खर्डे लिहून घेणे, त्यांच्या बद्दल थोडी

चर्चा करणे अशीही मदत माझी त्यांना अलीकडे झाली. त्यांचे शेवटचे दर्शन जुलैच्या अखेरीस झाले. थोडे बोलणेही.

त्यांच्या लोभास पात्र ठरण्यासारखे माझ्या हातून काही घडले नव्हते. तरीही त्यांचे प्रेम मला मिळाले.

'आजचा चार्वाक'च्या वाचकांसाठी लिहिलेल्या लेखात या साऱ्या व्यक्तिगत तपशीलांमध्ये जाण्याचे प्रयोजन काय, असा चोखंदळ, चिकित्सक वाचक प्रश्न करील, व ती गोष्ट योग्यच आहे. अच्युतराव पटवर्धनांच्या सांगण्यासारख्या आठवणी माझ्यापाशी नाहीत. ज्यांचे निवेदन करावे अशा महत्वाच्या विषयांवर माझ्या-त्यांच्या चर्चा झाल्या असेही नाही. जवळून, पण तरीही काही अंतरावरून त्यांना पाहण्याची, त्यांना जाणून घेण्याची संधी मला जवळपास तीस वर्षांच्या कालावधीत मिळाली. बेचाळीस ऑगस्ट क्रांतीचे हिरो, समाजवादी पक्षाचे एक संस्थापक व एकेकाळचे प्रमुख नेते, कृष्णमूर्तींच्या अंतर्वर्तुळातील एक व्यक्ती अशा कोणत्या तरी एका वा अधिक भूमिकांच्या अंगाने त्यांच्याशी मी मनाने जोडला गेलो नव्हतो. त्यांच्या व्यक्तित्वाचे कोडे त्यांच्याच मदतीने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उकलण्याच्या दृष्टीने ठरवून, जाणीवपूर्वक मी मागोवा घेत नव्हतो. वाचकाला या गोष्टी पार्श्वभूमी म्हणून माहीत व्हाव्यात यासाठी पार्श्वभूमी तपशीलात द्यावी याचे महत्व मला वाटले.

२

अच्युतजींच्या निधनानंतर त्यांच्यासंबंधी जे लेखन आले त्याची एक प्रासंगिकता व महत्व आहे. ऑगस्ट पर्वातील त्यांची कामगिरी गौरविली जावी हे स्वाभाविकच होते. त्यांच्या व्यक्तित्वाबद्दलही लिहिलं गेलं. त्यांच्या राजकारणनिवृत्तीनंतरच्या पर्वाबद्दल, 'अध्यात्माकडे ते वळले' असं लिहून बहुतेकांनी जवळपास त्यांचे निम्मे आयुष्य एक प्रकारे बाद करून टाकले. पण नंतरचा त्यांचा प्रवास ही अनेक अंगांनी महत्वाची घडामोड आहे. 'ते अध्यात्माकडे वळले' अशा प्रकारे त्याचे वर्णन करणे अच्युतजींना न्याय देणारे नाही. त्यांना न्याय केला जातो की नाही ही तशी महत्वाची बाब नाही. पण राजकारण, समाज परिवर्तन व नवसमाजाची निर्मिती यात आस्था असणाऱ्यांनी त्यांची वाटचाल डोळसपणे बघणे मात्र महत्वाचे व आवश्यक आहे.

एक गर्भश्रीमंत कुटुंबात त्यांचा जन्म झाला याचीही नोंद घेतली गेली आहे. त्यांच्या आंतरिक प्रवासाच्या दृष्टीने या वस्तुस्थितीइतकेच थिऑसफीचा मनोभावे स्वीकार केलेल्या वडिलांच्या संस्कारांचे महत्व आहे. किंबहुना ही गोष्ट अधिक महत्वाची म्हणायला हवी.

थिऑसफीच्या विचारप्रवाहाचा आणि चळवळीचा प्रसार

व प्रभाव ॲनी बेझंट यांच्या कर्तृत्वाशी व व्यक्तित्वाशी अतूटपणे निगडीत आहे. रावसाहेब व अच्युतराव यांचे वडील हरिभाऊ हे ॲनी बेझंट यांचे परमभक्त होते. त्यांच्या लेखी त्या 'अम्मा' होत्या. वंश, धर्म, राष्ट्र आणि असेच इतर भेदाभेद उल्लंघून जाणारी थिऑसफी ही मानवजातीच्या उत्थानाची, एका नव्या वैश्विक संस्कृतीची व समाजाच्या निर्मितीची चळवळ होती. हे कार्य करण्यासाठी गुरु म्हणून कार्य पार पाडणाऱ्या व्यक्ती अवतार घेत असतात, आणि अशा गुरुंच्या मार्गदर्शनाखाली, प्रेरणेने थिऑसफीचा प्रचार-प्रसार याच कामासाठी खास निवडलेल्या व प्रशिक्षण प्राप्त केलेल्या व्यक्तींकरवी होणार या दोन मध्यवर्ती मान्यता होत्या. भविष्यात गुरुची ('वर्ल्ड टीचर') भूमिका पार पाडण्यासाठी अवतार झालेले बालक म्हणून जे. कृष्णमूर्तींची ओळख पटल्याने ॲनी बेझंट यांनी अगदी लहानपणीच त्यांना व त्यांच्या भावाला पालक म्हणून रीतसर ताब्यात घेतले, त्यांचे शिक्षण केले, ही गोष्ट प्रसिध्द आहे. थिऑसफीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य आपल्या दोन मोठ्या मुलांनी करावे, त्यासाठी आयुष्य समर्पित करावे अशी हरिभाऊ व त्यांचे काका सीतारामपंत —ज्यांनी अच्युतरावांना दत्तक घेतले— त्यांची योजना होती. हा संस्कार लहान वयातच केला गेला, व तो खोलवर रुजला.

ॲनी बेझंट यांच्या प्रभावळीत मनोभावे प्रविष्ट झाले नसते तर हरिभाऊ न्यायमूर्ती रानड्यांच्या वळणाचे सुधारक

ठरले असते. थिऑसफी ही ब्राह्मो व प्रार्थना समाजांची अधिक बहुढंगी व थोडी अधिक गूढरम्य आवृत्ती होती.तिला वैश्विक परिमाण होते. राजकीयदृष्ट्या लिबरल विचारप्रणालीचेच हे कुटुंब होते. आपल्याला माहीत आहे की ॲनी बेझंट या अल्पकाळ राष्ट्रसभेच्या राजकारणातही सक्रीय होत्या; इतकेच नाही तर, त्या नेमस्त पक्षाला न पेलवण्याइतक्या जहाल व स्पष्टवक्त्या होत्या. 'होमरूल लीग'ची चळवळ त्यांनीपण दुसऱ्या महायुध्दाच्या काळात चालविली. (लोकमान्य टिळकांचे व त्यांचे वैचारिक व स्वभावप्रकृती, दोन्ही अंगांनी काही काही मतभेद असल्याने दोघांच्या स्वतंत्र 'होमरूल लीग' संघटना होत्या.) पुढे लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रसभेच्या राजकारणाला उग्र राष्ट्रवादी - वळण प्राप्त झाले तेव्हा ॲनी बेझंट राष्ट्रसभेपासून दूर गेल्या.

१९२०-२२ च्या असहकार आंदोलनाच्या प्रभावाखाली रावसाहेब व अच्युतराव आले नाहीत याचे आश्चर्य मग वाटत नाही. लोकांना रस्त्यावर आणणारी ही चळवळ लिबरल विचारप्रणालीच्या चौकटीत न बसणारी तर होतीच, पण 'खिलाफत'च्या मुद्यास महत्व देणारी ही चळवळ गैर अर्थाने धार्मिकतेचे पुनरुज्जीवन करणारी संकुचित राष्ट्रवादी चळवळ आहे असेही त्यांचे मत बनले असावे. बेझंट बाईंच्या बनारस येथील सेंट्रल हिंदू कॉलेजमध्ये दोघे शिकत होते. ही संस्था थिऑसफीस्ट गोतावळ्याची एक मध्यवर्ती संस्था होती, आणि तीमध्ये थिऑसफीस्टांची तरूण पिढी घडविली जात होती. जगाच्या व मानवजातीच्या उत्थानाचे युगकार्य पार पाडण्यासाठी आपली निवड झाली आहे, आपल्या वडिलांची व 'अम्मां'ची पण आपल्याकडून ती

थिऑसफीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य आपल्या दोन मोठ्या मुलांनी करावे... हा संस्कार लहान वयातच केला गेला, व तो खोलवर रुजला.

अपेक्षा आहे, याचा एक प्रकारे सौम्य धुंदी आणणारा प्रभाव मनावर पडावा असेही ते वय व ते वातावरण होते. समर्पित, उत्कट ध्येयवादी जीवन जगण्याचे हे स्वप्न साकार होण्यास व्यवहार आड येणार नव्हता: पोटापाण्याची चिंता कधीच पडणार नाही इतकी माया वडील व काका यांनी गोळा करून ठेवली होती.

जीवनशैली, आचारविचार, मन या सर्व पातळ्यांवर प्रादेशिक व राष्ट्रीय, दोन्ही मर्यादांनी संकुचित न बनलेले असे उन्नत व सुसंस्कृत व्यक्तित्व अच्युतरावांचे थिऑसफीच्या वातावरणात घडले. परमार्थी जीवनातच स्वार्थाचे विसर्जन करावयाचे, चारचौघांसारखे संसारी जीवन जगावयाचे नाही, ही गोष्टही स्वीकारल्यामुळे त्याही अंगाने संकुचित स्पर्श नव्हता.

एका अंगाने थिऑसफी हा धार्मिक संप्रदाय होता आणि कोणत्याही नव्या, कडव्या संप्रदायाची गुणवैशिष्ट्ये, मर्यादा त्यातही आढळणे स्वाभाविक होते. पण ॲनी बेझंट यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. इंग्लंडच्या सार्वजनिक जीवनात अनेक आघाड्यांवर अत्यंत क्रियाशिल सहभाग त्यांचा होता. संततिनियमनाचा, नास्तिक मताचा,समाजवादाचा प्रचार त्यांनी केला त्यावेळी या मतांचा पक्ष घेणे यासाठी फार मोठी किंमत मोजावी लागे. हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी हिंदू संस्कृती, अध्यात्मविचार, भारतीय स्वातंत्र्य यांचा पक्ष उचलून धरला. सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी त्यांच्या बद्दल म्हटले आहे,"In all her activities, whether in the social, educational or political field, her endeavour was to rouse the self-respect of the Indians and help in the renaissance of India.... her main aim was to see that India rose to her full stature and could as a free nation do for the world what none but she could do, namely, pour out over the earth from her place in the great commonwealth, the priceless spiritual treasures....." *(कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असता, मग ते क्षेत्र सामाजिक असो, शैक्षणिक असो वा राजकीय असो, भारतियांची अस्मिता जागावी आणि भारताचे पुनरुत्थान घडून यावे ह्या दिशेनेच त्यांची धडपड असे.... आपल्या श्रेष्ठत्वाला अनुरूप अशा उंचीवर भारत पोहोचला आहे आणि महान कॉमनवेल्थमधल्या आपल्या स्थानावरून खास स्वत:कडील अनमोल अध्यात्माच्या वैभवाचा वर्षाव भारत सर्व जगावर करीत आहे, हे स्वप्न वास्तवात उतरवणं हेच त्यांचं मुख्य ध्येय होतं...* त्यांनी स्थापना केलेली 'सेंट्रल हिंदू कॉलेज' ही बनारस येथील शिक्षणसंस्था हे बौध्दिकदृष्ट्या एक अत्यंत जागृत केंद्र होते.)

शोषण, अन्याय, दडपणूक यांच्या निरासावर, न्याय व समता प्रस्थापित करण्यावर, भौतिकदृष्ट्या समृध्द जग सर्वांसाठी निर्माण करण्यावर भर देणारा समाजवादाचा विचार, त्याच्या फेबियन अवतारामध्ये, अच्युतरावांनी विद्यार्थी दशेतच आत्मसात केला. पुरोहित वर्ग व धर्मपीठ यांचे नियंत्रण असलेल्या सुसंघटित, केंद्रीभूत धर्मांच्या अनिष्ट प्रभुत्वापासून मुक्ती साधण्याचे महत्त्वही त्यांच्या मनावर विद्यार्थी दशेतच ठसले. इतकेच नव्हे तर, लोकसंख्यावाढ नियंत्रण करण्याचे, कुटुंब नियोजनाचे महत्त्वही त्यांना त्याच काळात पटले होते असे म्हणावयास जागा आहे. थिऑसफीच्या प्रासादात एक दालन गूढ अध्यात्म मार्गाचे व मुक्तीचे जरूर होते.

अध्यात्मविचारांविषयी एक विधायक दृष्टी, गाढ़ आदर थिऑसफीच्या माध्यमाद्वारे अच्युतजींच्या मनात नक्कीच रुजला. त्यांचा त्या विचाराशी परिचय झाला. पण ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवण्याची ही भूमिका नव्हती. उलट भारताचे व सर्व मानवजातीचे ऐहिक व अध्यात्मिक उत्थान घडवून आणणे हे थिऑसफीचे युगकार्य मानलेले होते.

१९२४ साली हरिभाऊंचे अकाली निधन झाले. एका मोठ्या कुटुंबाची जबाबदारी रावसाहेब व अच्युतराव यांच्यावर येऊन पडली. मानसिकदृष्टया हा मोठा धक्का राहिला असला पाहिजे. वडिलांचे अलोट वात्सल्य आणि त्याचवेळी त्यांची आपल्या जीवनकार्याविषयी अपेक्षा यांचे नाही म्हटले तरी तरुण मुलगा/मुलगी यांच्यावर प्रचंड दडपण येते. एकाच वेळी ते प्रोत्साहक व काचणारे, दोन्ही असते. खानदानी वळणाच्या मोठ्या कुटुंबाचे पालकत्व करण्याचीही जबाबदारी खांद्यावर काही प्रमाणात येऊन पडली. याच सुमारास एका दृष्टीने अधिक मोठी व मुळापासून हादरा देणारी एक घटना घडली. औपचारिकरित्या, समारंभपूर्वक 'जगद् गुरु' ('वर्ल्ड टीचर') म्हणून कृष्णमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. पण कृष्णमूर्तींनी १९२८ साली त्यांना देऊ केलेले हे स्थान, त्यांच्यासाठी निर्माण केलेला 'ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ द ईस्ट' हा संघ, त्याची अलोट अशी मालमत्ता यांचा संपूर्ण त्याग केला; थिऑसफीमध्ये जे एक गूढ अध्यात्ममार्गाचे व मुक्तीचे पारलौकिक अंग होते. ते त्यांनी झूट ठरविले. हा प्रचंड उत्पातच होता. रावसाहेब व अच्युतराव कृष्णमूर्तींच्या पक्षाचे होते. जीवितकार्य म्हणून ज्याचा स्वीकार केला होता, ज्याचे धेयही लागले असतील, एक उदात्त स्वप्नही पहात असतील ते विरून गेले असा कृष्णमूर्तींच्या बंडाचा परिणाम झाला असा तर्क होतो. अचिकित्सक व भाविक वृत्तीने तोवर आत्मसात केलेल्या, सत्य मानलेल्या कित्येक गोष्टींना- संकल्पना, सिध्दांत, समजुती, रीतीभाती, कर्मकांड, भविष्यविषयीच्या धारणा/चित्रे इत्यादी— आता अर्थच उरला नाही असे झाले असणार.

३

योगायोगाने याच काही वर्षांमध्ये, फक्त इंग्रज सभासदच नियुक्त केलेल्या सायमन कमिशनच्या नेमणुकीपासून, देशातले वातावरण तापत चालले. 'वसाहतीच्या स्वराज्या'च्या कॅनडा, ऑस्ट्रेलिया त्यांच्या प्रमाणे 'डोमिनियन स्टेटस' मागणीला मागे टाकून राष्ट्रसभेचे तरुण नेतृत्व पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करीत होते. ब्रिटिश राज्यकर्ते पूर्ण स्वातंत्र्य पदरात टाकायला नकार देणार ही गोष्ट उघड होती. 'वसाहतीचे स्वराज्य' या स्वरूपात ठोस अधिकार पदरात पडतात का हे वर्षभर

धांबून पहावे असे ठरले. पं. नेहरू, सुभाष बोस ही तरुण नेत्यांमध्ये मोठी नावे होती. उत्कट ध्येयवादी व कर्तवगार तरुण व्यक्तीला या वातावरणाच्या प्रभावापासून मुक्त राहणे शक्यच नव्हते. गांधीजींच्या कायदेभंग/असहकार व यांवर भर देणाऱ्या सत्याग्रह नीतीला ॲनी बेझंट यांनी १९१९-२० पासूनच कसून विरोध केलेला होता. त्यांच्याशी असलेली भावनिक जवळीक, त्यांचा कौटुंबिक संबंध लक्षात घेता, १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये उडी टाकण्याचा निर्णय सोपा गेला नसेल हे उघड आहे. असे. दिसते की, अच्युतरावांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यास कृष्णमूर्तींची अनुकूलता नव्हती. १९५० नंतरच्या काळातील कृष्णमूर्तींची सारी शिकवण लक्षात घेतली तर माणूस व समाज बदलण्याचे प्रचलित आदर्शवादी सर्व मार्ग वा उपक्रम व्यर्थच आहेत असे नव्हे तर खोटे आहेत, असे त्यांचे तेव्हाही मत असावे असे म्हणता येते. नवा माणूस व नवे जग निर्माण करण्याच्या एकमेव खऱ्या कृतीपासून, मार्गावरून अच्युतजी च्युत होत आहेत असाच त्यांचा अभिप्राय राहिला असला तर नवल नाही.

१९३० ते १९५० या वीस वर्षांच्या कालखंडातील अच्युतजींचे जीवन व कार्य सुपरिचित आहे. स्वातंत्र्य संपादनापुरते ते राष्ट्रसभेच्या स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या

स्थापनेत त्यांचा महत्वाचा सहभाग तर होताच , पण स्वातंत्र्य मिळाल्यावरही तीनचार वर्षे त्यांनी मोठ्या हिरीरीने पक्षीय राजकारण केले. १९३० च्या लढ्यात ते सहभागी झाले तेव्हा समाजपरिवर्तनाच्या आधुनिक, बुध्दिवादी शास्त्रशुध्द (रॅशनल-सायंटिफिक) मार्गाचा अवलंब करून भारतीय समाजाचा कायापालट घडवून आणावयाचे उद्दिष्ट त्यांनी स्वीकारले. कोणताही विचारी, प्रबुध्द (एनलायटन्ड) माणूस समाजवादाचाच ध्येय म्हणून स्वीकार करील, अर्थव्यवस्थेची पुनर्रचना समाजवादी तत्त्वांनुसार करणे हीच बुध्दीचे ('रीझन'चे) समाधान करणारी एकमेव मांडणी आहे, अशी त्यांची धारणा असावी. आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश व अन्य काही सहकाऱ्यांप्रमाणे अच्युतजी कधीच सांप्रदायिक मार्क्सवादी (ऑर्थोडॉक्स) नव्हते. फेबियन समाजवाद त्यांना जास्त जवळचा होता.

थिऑसफीला जे गूढ पारलौकिक विद्येचे व मोक्षमार्गाचे अंग होते ते अच्युतजींनी पूर्णपणे टाकून दिले होते. अध्यात्मविचार, गौतम बुध्दांची शिकवण, साधनेचे मार्ग/तंत्रे यांच्याविषयीचा संस्कार, ह्यांनी घडलेला पिंड टिकून राहिला. पण तो या संपूर्ण काळात निद्रिस्त ज्वालामुखीसारखा दबलेला राहिला.

स्वातंत्र्यलढा, काँग्रेस समाजवादी पक्षाची उभारणी, मग १९४२ ते ४५/४६ भूमिगत 'छोडो भारत' चळवळ, आणि स्वातंत्र्यानंतर समाजवादी पक्षाचे स्वतंत्र राजकारण या सगळ्या गडबडीत अंतर्मुख होऊन आपल्या धारणा, गृहिते तपासून पहावयास त्यांना सवड मिळाली नसली तर आश्चर्य नाही. मात्र समाजपरिवर्तनाचे व समाजवादाच्या प्रस्थापनेचे राजकारण करीत असताना व्यवहारातल्या वास्तवाचे दर्शन त्यांना होतच होते. इतरांना असूया वाटावी इतक्या सहजपणे, विनासायास तरुण वयात त्यांची नेत्यांमध्ये गणना झाली. पद, सत्ता, लोकप्रियता, कीर्ती प्राप्त झाल्यावर, लोकमानसावर आपले अधिराज्य आहे हे अनुभवल्यावर सामान्यतः माणसाला त्यांचा लोभ जडतो. त्यातच गुरफटून जाऊन, या सर्व गोष्टी वाढत राहाव्यात किमान कमी होऊ नयेत, यासाठी अहंकेंद्री असे वैयक्तिक राजकारण मोठ्यां, व्यापक राजकारणाच्या पोटात तो करू लागतो. अवतीभोवती जे काही घडत असते त्याकडे दक्षतेने, डोळसपणे, तटस्थपणे पाहण्याची क्षमता गमावून बसतो. तटस्थ, विलक्षण जागृत व भेदक दृष्टी हा अच्युतजींचा एक मोठा गुणविशेष होता.

स्वातंत्र्याचे उदात्त ध्येय मागे पडले, आणि लोकशाही राज्यव्यवस्थेमधील सत्तेचे पक्षांपक्षांमधले व पक्षांतर्गत राजकारण जसे ठळक बनले तसे काही प्रश्न तीव्र स्वरूपात अच्युतजींपुढे उपस्थित झाले असावेत असा माझा तर्क आहे.

स्वत:च्या, आकांक्षा वा स्वार्थ साधण्यासाठी जी माणसं सार्वजनिक जीवनात उतरतात, वा मुळात ध्येयवादाने प्रेरित झालेली माणसे कळत नकळत स्वार्थसाधनेच्या मार्गा[illegible] तेव्हा त्यांना अच्युतजींना पडले तसे प्रश्न पडत [illegible] हे लक्षात घेतले पाहिजे. काही व्यक्ती स्वत:च्या, संकुचित स्वार्थ वा आकांक्षेच्या पातळीवर क्रियाशील नसतात. त्यांना संस्था चालवायच्या असतात, काही उद्दिष्टे साध्य करावयाची असतात, व्यवस्था, परिवर्तन घडवून आणावयाचे असते. या सगळ्या गोष्टी व्यवहारी, संसारी जगात घडवून आणावयाच्या आहेत, आणि 'व्यवहारी जगात गोष्टी अशाच पार पाडावयाच्या असतात, कारण माणसांचा स्वभाव असाच असतो' अशा आशयाचा निवाडा करून ते गटवाजी, डावपेच, कारस्थाने

थिऑसफीला जे गूढ पारलौकिक विद्येचे व मोक्षमार्गाचे अंग होते ते अच्युतजींनी पूर्णपणे टाकून दिले होते. अध्यात्मविचार, गौतम बुध्दांची शिकवण, साधनेचे मार्ग/तंत्रे यांच्याविषयीचा संस्कार, ह्यांनी घडलेला पिंड टिकून राहिला.

इत्यादी करीत असतात. परिस्थिती, माणसे, प्रसंग ते हाताळतात, हवे तसे घडवितात: संघटनाकुशल, व्यवहारकुशल म्हणून त्यांचे कौतुकही होते. त्यांनाही असे प्रश्न पडत नाहीत.

माणसांची आंतरिक व बाह्य व्यक्तित्वे, त्यांचे इतरांशी, चराचर सृष्टीशी असलेले संबंध मंगल, कल्याणप्रद व सुंदर आहेत असे जग निर्माण करण्यासाठी आपले जीवन आहे असा खोलवर संस्कार अच्युतजींवर झालेला होता, ते आपले जीवितकार्य आहे हे त्यांनी स्वीकारलेही होते. ही गोष्ट खरी असेल तर सगळ्या गोष्टी या कसोट्यांवर ताडून, तपासून पाहिल्या जाण्याची क्रिया सतत एका बाजूला १९३० ते ५० या काळातही चालू असणार. तीव्र संवेदनाशील मन, कुशाग्र बुध्दिमत्ता, चिंतनशील वृत्ती आणि सदैव दक्ष तटस्थता यांची देणगी अच्युतजींना लाभलेली होती. कामना, वासना, विकार, आसक्ती इत्यादींपासून ते मुक्त होते असे सुचवयाचे नाही. राजकारणाच्या, समाजकारणाच्या व्यवहारात पडल्यावर व्यवहार यशस्वी करण्यासाठी धोरणीपणाने, प्रसंगी हिकमतीने, डावपेच खेळण्याइतपत ते व्यवहारी पण होते. स्वत:साठी त्यांना काही मिळवयाचे नव्हते, आणि म्हणून शल्यविशारदाच्या थंडपणे 'कठोर'पणे, सफाईने ते व्यवहार पार पाडीत असावेत अशी छाप मनावर उमटे. पण स्वातंत्र्यसंपादनाच्या, समाजवादाच्या प्रस्थापनेच्या या प्रकारच्या राजकारणामधून स्वातंत्र्य, समाजवाद ही ध्येये साकार होण्यामधून जे परिवर्तन माणसे व त्यांचे संबंध यांच्यात घडून यायला हवे त्या दिशेने खरोखर पाऊल

घडत आहे का, या स्वरूपाचा प्रश्न अच्युतजींच्या मनात सतत उपस्थित होता, विशेषत: नंतर नंतरच्या काळात तो अधिक तीव्र बनत गेला असा माझा तर्क आहे.

. १९४५ साली अमेरिकेने, तसे पाहिले तर दोस्त राष्ट्रांनीच जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉंब टाकले. जर्मनी व जपान यांच्या विरुध्दचे युध्द जिंकण्यासाठी हे बॉंब टाकण्याची गरज नसताना, या नव्या अस्त्राची संहारकता ताडून पाहण्यासाठी, आणि स्वत:च्या बळाची दहशत जगात निर्माण करण्याच्या दृष्टीने, शक्तिप्रदर्शनातला उन्माद अनुभवण्याच्या मोहापायी बॉंब, दाट मानवी वस्ती असलेल्या शहरांवर टाकले गेले. या घटनेने आपल्याला मोठा धक्का बसला, अंतर्मुख केले असे अच्युतजींनी म्हटले आहे.

अच्युतजींचा हा प्रतिसाद समजण्यासाठी पुढील तथ्य ध्यानात ठेवले पाहिजे. १९३३-३४ नंतर जर्मनीत हिटलरचा उत्कर्ष झाला व नाझी राजवट प्रस्थापित झाली. इकडे पूर्वेकडे जपान निर्दयपणे व निर्लज्जपणे आशिया खंडात आपले साम्राज्य प्रस्थापित करीत चालले होते. चीनवर जपानने आक्रमण केले होते. फासीझम, नाझीवाद, जपानची राजवट ही मूर्तिमंत दुष्टतेची ('ईव्हल') रूपे आहेत, या राजवटी सैतानी आहेत ही धारणा जगभर दृढ होत गेली. माणुसकीचा मुडदा पडला होता याची खंत तर नव्हतीच पण उलट त्याचे कौतुकच या राजवटींखाली होताना दिसत होते. या दुष्ट प्रवृत्तींचे व शक्तीचे निर्दालन करण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत असा दोस्त राष्ट्रांचा दावा होता. भारतीय स्वातंत्र्याच्या मुद्यावरून ब्रिटिशांशी भांडण चालले असतानाही, या दाव्यात तथ्य आहे हे गांधी, नेहरू यांच्या प्रमाणेच अच्युतजींसारख्या अनेकांचे मत होते. 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' हा सुभाष बाबूंचा युक्तीवाद त्यांना मान्य होणे शक्य नव्हते. हा दावा करणाऱ्या राष्ट्रांनी अशी निखळ दुष्ट कृती करावी याचा अर्थ काय होता?

संवेदनशील अंतर्मुख व्यक्तीला मुळातून विचार करायला लावणाऱ्या घटना भारतातही घडत होत्याच. बेचाळीस क्रांतीचीही अधोगती साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या वाटचालीत त्यांना अनुभवास आली. १९४६ नंतरचे हिंदू-मुस्लिम दंगे आणि स्वातंत्र्यानंतर पेटलेला वणवा, त्यात होरपळून गेलेली माणुसकी याने गांधी किती सैरभैर व अंतर्मुख झाले ते आपल्याला माहीतच आहे. जमातवादाचे मार्क्सवादी राष्ट्रवादी भूमिकेतून विश्लेषण करणारे पुस्तक (अशोक मेहतांच्या साथीने) 'कम्यूनल ट्रॅगल इन इंडिया' अच्युतजींनी लिहिले होते. ते सारे सिध्दांतन अर्धसत्य आहे ही गोष्ट १९४६-४७ सालच्या घटनांनी स्पष्ट केली. सत्तांतराच्या वाटाघाटींच्या ओघात कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचे जे वर्तन त्यांनी पाहिले तेही विषाद उत्पन्न करणारे होते. खुद्द कॉंग्रेसमधील जातीयवाद, गटबाजी, खोटेपणा, नेतृत्वावरूनचे हेवेदावे व मत्सरी कृती यांचा अच्युतजींनी भरपूर अनुभव व्यक्तिश: घेतला होता.

सुष्ट ('गुड') माणूस व समाज यांची निर्मिती व्हावयाची असेल तर रुढ अर्थाच्या समाजकारण-राजकारण यांच्यामधून ती होऊ शकत नाही, मानवी स्वभावप्रकृतीत खोलवर पाळेमुळे असलेल्या दुष्टतेचे निर्मूलन साध्य व्हायला हवे; म्हणजे, ही दुष्टता माणसाच्या ठायी कोठून व कशामधून येते, तिची एवढी पकड माणसावर का असते, त्या पकडीमधून माणूस कधी व कसा सुटतो याचा शोध घेणे प्रथम नितांत जरूरीचे आहे, अशी अच्युतजींची अधिकाधिक खात्री पटत चालली.

तरीही ते राजकारणात राहिले. कॉंग्रेसमधून बाहेर पडून समाजवादी पक्षाची स्वतंत्र उभारणी केली गेली. यात त्यांचा पूर्ण सहभाग होता. याचा अर्थ असा होतो की, लोकशाही राजकारणाच्या मार्गाने सत्ता काबीज करणे, सत्तेचा वापर करून समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे, न्याय व समता यांच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने फेररचना करणे, समृध्दी व विकास यांसाठी नियोजनाचा मार्ग अंगिकारणे इत्यादी उद्दिष्टे त्यांना अर्थपूर्ण व महत्वाची वाटत होती. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजवादी पक्ष त्यांना हवा होता, सत्तेचे राजकारण करण्याची गरजही त्यांना मान्य होती. मग दोनतीन वर्षांच्या अल्पावधीत त्यांनी पक्ष व पक्षीय राजकारण यांचा त्याग का केला?

सुष्ट ('गुड') माणूस व समाज यांची निर्मिती व्हावयाची असेल तर रुढ अर्थाच्या समाजकारण- राजकारण यांच्यामधून ती होऊ शकत नाही, मानवी स्वभावप्रकृतीत खोलवर पाळेमुळे असलेल्या दुष्टतेचे निर्मूलन साध्य व्हायला हवे

तत्वत: समाजवादासारखे उदात्त ध्येय समोर ठेवणाऱ्या पक्षात, चळवळीत वैचारिक मतभेदांची परिणती नेत्यांमधील हेवेदावे, चुरस व राजकारण यांच्यात होण्याची गरज नाही. नेत्यांमध्ये बंधुभावाचा प्रत्यय यावयास हवा. पण समाजवादी पक्षात नेतेपदी आरूढ झालेल्या तरुण नेत्यांमध्ये 'नायकां'ची जरा गर्दीच झाली होती. आणि दुर्दैवाने, हे नायक मनाने हवे तितके मोठे नव्हते. वैचारिक मतभेदाचे देखील राजकारण वस्तुत: व्हावयास नको; पण ते राजकारण जेव्हा बेमालूमपणे नेत्यांमधील सत्तेच्या राजकारणात अंतर्भूत होते तेव्हा ते हिणकस पातळी गाठते. असे हिणकस राजकारण पक्षामध्येच

करण्याइतकी कोती मने असलेले नेतृत्व असलेला पक्ष सत्तेवर आला तरी समाजवादी समाज कसा घडवू शकणार होता? अद्यापी बाल्यावस्थेत असलेल्या स्वपक्षातील जिवाभावाचे मित्र व सहकारी असलेल्यांशीच संघर्ष करणे एकंदरीतच अवघड होते. स्वत:चे नेतृत्व पक्षात प्रस्थापित करावयाचे, इतरांवर मात करावयाची असे रूप या संघर्षाला अटळपणे येणार होते. या राजकारणात यशस्वी व्हावयाचे तर स्वत: हिणकस पातळीवर उतरण्याची, स्वत:चे व्यक्तित्वही भ्रष्ट व बटबटीत, असंस्कृत होऊ देण्याची तयारी ठेवावयास हवी होती. असा काहीसा पेच अच्युतरावांपुढे उपस्थित झाला अशी माझ्या मनावरची छाप आहे.

उन्नत, सुसंस्कृत व्यक्तित्वाची किंमत देऊन काहीही करणे ही गोष्ट अच्युतजींना खपवून न घेता येणारी गोष्ट होती हे त्यांना ओळखणारा कोणीही जाणेल. स्वातंत्र्यलढ्याच्या व काँग्रेस समाजवादी पक्षाच्या काळात हिकमती व डावपेच खेळण्याचा धोरणीपणा त्यांनी जरूर प्रकट केला; नेत्याच्या ठायी असाव्या लागणाऱ्या मुत्सद्दीपणाचा तो एक भाग असतो. पण त्या बाबतीतही त्यांनी दोन पथ्ये सांभाळलेली दिसतात. स्वत:साठी काही मिळवून घेण्यासाठी आणि दुसऱ्यावर मात करण्याचे समाधान मिळवण्यासाठी कधी तसे करावयाचे नाही. इष्ट कार्य तडीला नेण्यासाठी आवश्यक म्हणून अशा गोष्टी करावयाच्या.

पक्ष व राजकारण यांचा त्याग करण्याचे आणखी एक स्पष्टीकरण आहे, व ते निर्णायक महत्वाचे आहे. अन्याय, शोषण, दडपणूक, दारिद्र्य, विषमता इत्यादी अनिष्ट गोष्टींचे मूळ बाह्य समाजरचनेमध्ये, व्यवस्थेमध्येच आहे की ते मानवाच्या मनामध्येच खोलवर कोठेतरी आहे? तिथून त्याचे उन्मूलन झाल्याशिवाय लढे, संघर्ष, सत्तासंपादन या मार्गांनी खरोखरच या अनिष्ट गोष्टींचा निरास होणार आहे का? हा प्रश्न अच्युतजींच्या मनात तीव्र स्वरूपात उपस्थित झाला. हिरोशिमा-नागासाकी या शहरांवर अणुबॉंब टाकण्याच्या घटनेमधून समोर आलेल्या प्रश्नाची येथे भारतीय संदर्भात जणु पुनरावृत्तीच झाली.

उन्नत, सुसंस्कृत माणसांचा, सर्वांचे कल्याण साधणारा, मंगल व समृध्द समाज, जेथे जाती, धर्म, भाषा, वंश असा भेदाभेद नाही असा समाज अस्तित्वात आणण्यासाठी जीवन समर्पित करण्याची भूमिका कायम राहिली. पक्ष व राजकारण यांचा त्याग करून प्रश्नाचे उत्तर शोधण्याकडे अच्युतजी वळले.

४

जे. कृष्णमूर्ती अच्युतजींपेक्षा अकरा वर्षांनी मोठे तर होतेच; त्यात 'जगद्गुरू' म्हणून त्यांची औपचारिकपणे प्रतिष्ठापना केली गेली तेव्हा अच्युतरावांचे वय संस्काक्षम होते. तरीही हा संबंध गुरू-शिष्य असा नव्हता असेच म्हटले पाहिजे.

१९३० नंतरच्या काळात या दोघांमध्ये कितपत क्रियाशील संबंध होता माहीत नाही. त्यांचे मार्ग एकदम वेगळे झाले होते इतके खचित. आदर, आपुलकी, आस्था कायम असणारच. महायुध्दाच्या काळात कृष्णमूर्ती परदेशातच होते. युध्द संपल्यानंतर जाहीर प्रवचने, लहान गटात संभाषणे असे त्यांचे कार्यक्रम सुरू झाले. १९४७ पासून ते भारतात नियमितपणे येऊ लागले. त्यांची प्रभावळ जगभर पसरलेली होतीच.

कृष्णमूर्तींना कशाची तळमळ वा उत्कट आस्था होती? काय घडून यायला त्यांना हवे होते? सर्व अनिष्टांचे निराकरण जिथे झालेले आहे असे जग निर्माण व्हावे हीच तळमळ त्यांच्या साऱ्या सांगण्यामधून प्रकट होत होती. दैन्य, दारिद्र्य, शोषण, अन्याय, हिंसा, कलह यांच्या समूळ निर्मूलनाचीच गोष्ट ते करीत आहेत असे स्वच्छपणे प्रतीत होत होते. मुक्त मानवाचे स्वप्न साकार करण्यासाठीच त्यांची धडपड, पोटतिडीक दिसते.

जे जे म्हणून अनिष्ट आहे त्याचे मूळ खरोखर कशात, कोठे आहे, आणि त्याचे निर्मूलन कधी होते, अनिष्टाचे निर्मूलन करणारी कृती कोणती याचा त्यांना स्वत:ला झालेला 'साक्षात्कार', दर्शन याविषयीच ते अगणित अंगांनी व प्रश्नांच्या आधारे बोलत असत. अनिष्टांचे निर्मूलन करण्याचे सर्व रूढ धार्मिक व इहवादी मार्ग/उपाय कसे व्यर्थ आहेत याची भेदक उकल करण्यावर त्यांच्या प्रवचनांचा व संभाषणांचा भर असतो. शब्द व भाषा यांच्या उपयोगाने चालणाऱ्या मनोव्यापारांचे स्वरूप व मर्यादा यांच्या खोलात कृष्णमूर्ती जितके गेले आहेत तेवढे क्वचितच कोणी जाते. दैनंदिन जीवनातील भौतिक व्यवहार पार पाडण्यासाठी घडविले जाणारे शब्द व वापरली जाणारी भाषा आणि मनोव्यापारांच्यासाठी व पातळीवर घडविले जाणारे शब्द व वापरली जाणारी भाषा या मूलत: वेगळ्या आहेत, त्यांचे प्रयाजन व रचना-आशय भिन्न आहेत हे एक त्यांचे मुळापर्यंत जाऊन उकल करणारे प्रतिपादन आहे. मनोव्यापार व त्यांच्यासाठी घडविले जाणारे शब्द व भाषा यातच वस्तुत: सर्व अनिष्टांचे मूळ आहे असे त्यांचे सांगणे आहे.

सगळे गुरू, प्रेषित, संत-महात्मे, सर्व ग्रंथ, सर्व संप्रदाय; सर्व संघटना/धर्म कृष्णमूर्तींनी अव्हेरले. रूढ अर्थाने ते साधकही नव्हते. त्यांचे बोल प्रचितीचे असत. अच्युतजींना जो शोध घ्यायचा होता त्या वाटेवर त्यांना कृष्णमूर्तींचा विशेष उपयोग होता. अमूक एका वाटेने गेलास तर सत्य सापडेल, वा मोक्ष मिळेल, वा सर्व प्रश्नांची उत्तरे हाती

असे सांगणारा गुरु त्यांना नको होता. ज्याच्याशी संभाषण केले असतां, ज्यांची प्रवचने ऐकली असतां आपण नित्य सावधान राहू अशी कृष्णमूर्ती ही व्यक्ती होती. योगायोगाने त्यांचा आधीचा ऋणानुबंध होताच.

१९५० ते थेट मृत्यूपर्यंत कृष्णमूर्तींच्या व्यक्तित्वाचा व त्यांच्या प्रचितीच्या बोलांचा गाढ प्रभाव अच्युतजींवर होता यात काही शंका नाही. पण या दोघांमध्ये या सर्व काळातही एक अंतर कायम राहिले.

५

व्यवहारी जगाकडे, ऐहिकाकडे अच्युतजींनी पाठ फिरवलेली नव्हतीच. देशात व जगात काय घडत आहे याकडे त्यांचे जागरूक ध्यान होते. विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रातील घडामोडी यांच्याकडेही त्यांचे बारीक लक्ष असे. त्यांना देशाची चिंता होती. विकास व समृध्दी प्राप्त करण्यासाठी स्वीकारलेल्या नियोजनाच्या मार्गाची इष्टता त्यांना पटलेली होती. या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरूप्रमाणेच अच्युतजीही अगदी अलिकडेपर्यंत आधुनिकीकरणाचा, पाश्चात्य नमुन्याच्या विकासाचा पुरस्कार करणारे होते. लोकसंख्या वाढीवर कठोर नियंत्रण घातले नाही तर दारिद्रय व विषमता यांचे उच्चाटन करण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतील असे त्यांचे ठाम मत फार पूर्वीच बनले होते.

पक्ष व राजकारण यांचा त्याग केल्यावर रूढार्थाने निवृत्तीपर जीवन व्यतीत करण्याचे त्यांनी ठरविले असते तर ती गोष्ट त्यांना सहजसाध्य होती. चरितार्थासाठी व्यवसाय करण्याची गरज नव्हती. गाजविलेल्या कर्तृत्वाच्या जिवावर वाचन, चिंतन व लेखन करीत उर्वरित आयुष्य ते सुखाने जगू शकले असते. परिवर्तनामध्ये त्यांची आस्था कमी झालेली नव्हती. इष्ट परिवर्तन घडून यावयाचे असेल तर नवा माणूस घडविणारे शिक्षण हे प्रभावी साधन आहे ही मांडणी त्यांनी स्पष्टपणे त्या काळात केली होती का हे माहीत नाही. पण कृष्णमूर्तींच्या चाहत्यांनी अनुयायांनी त्यांच्या शिकवणुकीला अनुसरून भारतात (व अन्य देशातही) काही शाळा/महाविद्यालये चालविली होती. वेझंटबाईंपासून हा वारसा चालत आलेला होता. या गोतावळ्याशी पूर्वीपासून अच्युतजींचा संबंधही होता व त्यांना या संस्थेविषयी आत्मीयताही होती. १९५० नंतरची अनेक वर्षे अच्युतजींनी कृष्णमूर्ती फाऊंडेशनच्या शाळांच्या कामात सक्रीय जबाबदारी पार पाडली. राजघाट (वाराणसी) येथे शेतकी प्रशिक्षण शाळेची त्यांनी उभारणी केल्याचा उल्लेख आरंभी आला आहे. त्यांचे निधन झाले त्या आधी काही दिवस पश्चिम महाराष्ट्रात कृष्णमूर्ती फाउंडेशनची एक नवी निवासी शाळा उभारण्याच्या कामी अर्थसहाय्याचे पाठबळ उभे करण्यात ते गुंतले होते ही गोष्ट प्रसिध्द झाली आहे.

पक्ष व राजकारण यांचा त्याग केल्यावरही विचाराने काही काळ ते समाजवादी राहिले असे दिसते. विकासाचा पाश्चात्य नमुनाच त्यांच्या डोळ्यासमोर असावा. नियोजन हे मुख्य साधन / हत्यार वापरावयाचे होते. स्थूलमानाने पं. नेहरूंनी अंगिकारलेले धोरण त्यांना मान्य असावे. १९७३ साली दिलेल्या एका व्याख्यानात त्यांनी पं. नेहरूंचा अत्यंत गौरवाने उल्लेख केला आहे. ते म्हणतात, "Even those who had seen that socialism was the obvious direction of economic and social advancement could not grasp the most effective method for achieving that objective. The credit for this clear thinking must go to Jawaharlal Nehru. Every step taken by the Congress in the sphere of planning from the time the Congress set up the National Planning Committee in 1938.

१९५० ते थेट मृत्यूपर्यंत कृष्णमूर्तींच्या व्यक्तित्वाचा व त्यांच्या प्रचितीच्या बोलांचा गाढ प्रभाव अच्युतजींवर होता यात काही शंका नाही. पण या दोघांमध्ये या सर्व काळातही एक अंतर कायम राहिले.

till the creation of the Planning Commission in 1950, was the result of Jawaharlal Nehru's personal initiative and firm adherance to the underlying principles of a planned economy.

(आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणण्याचा समाजवाद हाच मार्ग आहे हे ज्यांनी जाणलं होतं त्यांनाही ह्या मार्गावर वाटचाल करण्यासाठी कोणती पध्दत सर्वात अधिक परिणामकारक ठरेल हे उमगत नव्हतं. ह्या विषयात सुस्पष्ट जाण असण्याचं श्रेय जवाहरलाल नेहरूंनाच द्यावं लागतं. १९३८ मधील राष्ट्रीय नियोजन समितीच्या स्थापनेपासून ते थेट १९५० मधील नियोजन मंडळाच्या निर्मितीपर्यंत काँग्रसने नियोजनाच्या संदर्भात जी पावलं उचलली त्यामागे जवाहरलाल नेहरूंची वैयक्तिक प्रेरणा आणि नियोजनबध्द आर्थिक व्यवस्थेतील तत्त्वांवर असलेली त्यांची अविचल निष्ठा कारणीभूत होती.)

अच्युतजी हे पोथीनिष्ठ समाजवादी वा मार्क्सवादी कधीच नव्हते. उत्पादनसाधनांचे, विशेषत: उद्योग व व्यापार यांचे सरसकट राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी अच्युतजींनी १९५०

साली पण उचलून धरली नसती. अर्थव्यवस्थेतील 'मोक्याच्या जागा' शासनाच्या नियंत्रणाखाली/ताब्यात असाव्यात, सार्वजनिक क्षेत्राचे आकारमान अर्थव्यवस्थेत पुरेसे मोठे असावे, त्याचे खाजगी क्षेत्रावर वर्चस्व असावे, 'समाज कल्याणा'च्या विविध योजनांद्वारे विषमतेचे मान भरीव स्वरूपात कमी करावे, शेती व उद्योग यांचे आधुनिकीकरणाच्या मागनि उत्पादन वाढवून समृध्दी उत्पन्न करावी, समृध्दी उत्पन्न करण्यासाठी आधुनिक विज्ञान व तंत्रविज्ञान यांची कास धरावी याचा त्यांनी पुरस्कार केला असता; यालाच त्यांनी समाजवादाचा कार्यक्रम मानले असते. त्यांच्या समाजवादाची जातकुळी फेबियन होती.

'लोकां'चे स्तोम माजविणारे या अर्थनि अच्युतजी पॉप्युलिस्ट समाजवादी नव्हते. लोक अडाणी असतात, पूर्वग्रह, आंधळ्या समजुती, जुनाट सवयी इत्यादी त्यांच्या ठायी रुजलेल्या असतात. म्हणून लोक हे स्वत:चा अभ्युदय घडवून आणण्याच्या पुष्कळदा आडच येतात: हुकूमशाही दडपणूक अच्युतजींना मान्य नव्हती, पण प्रबुध्द नेतृत्वाच्या दृढ व कठोर शासनाची गरज असते असे ते म्हणाले असते. समाजवादाच्या प्रस्थापनेत शासनाची मोठी, मध्यवर्ती व निर्णायक भूमिका राहील ही त्यांची १९५० च्या सुमारासची

पक्ष व राजकारण यांचा त्याग केल्यावरही अच्युतजींची सार्वजनिक जीवनातील आस्था व गुंतवणूक जवळपास तेवढीच राहिली. एक विवक्षित क्रियाशीलता त्यांनी वर्ज्य मानली.

भूमिका नक्कीच होती. काँग्रेस सरकारवरची त्यांची या काळातली टीका मुख्यत: भूमिकेविरुध्द नव्हती. शासन पुरेसे दृढ, कठोर व कार्यक्षम नाही, अडाणी व हितसंबंधी अडवणूक पं. नेहरू आपलं वजन व सत्ता वापरून खंबीरपणे मोडून काढत नाहीत, ही त्यांची मुख्य तक्रार होती. काही काळ चीनमधील साम्यवादी राजवटीचे अच्युतजींना कौतुक होते अशीही छाप माझ्या मनावर आहे.

तात्पर्य असे की, पक्ष व राजकारण यांचा त्याग केल्यावरही अच्युतजींची सार्वजनिक जीवनातील आस्था व गुंतवणूक जवळपास तेवढीच राहिली. एक विवक्षित क्रियाशीलता त्यांनी वर्ज्य मानली. आणि हा तुकडा नीट पडावा म्हणून कटाक्षाने पुढची काही वर्षे ते सार्वजनिक व्यासपीठावर कोठे आले नाहीत.

कृष्णमूर्ती स्वत: रुढ अर्थनि अध्यात्ममार्गी नव्हते. अच्युतजींनी स्वत:ला कृष्णमूर्ती इतकेही मनाने निर्लिप्त ठेवलेले नव्हते.

त्यांनी निवडलेली सार्वजनिक कार्याची (कृष्णमूर्ती फाऊंडेशनचे शैक्षणिक कार्य) जबाबदारी सक्रीयपणे पार पाडीत असताना सामाजिक - आर्थिक - राजकीय घडामोडी, भारतीय समाजाचे मानस व व्यवहार, व्यक्तीच्या अंतर्यामी चालणारे मनोव्यापार यांचे ज्ञानेंद्रिये उघडी, सावधान व दक्ष ठेवून ते अवलोकन करीत होते. अवलोकन किंवा 'बघणे' कृष्णमूर्तींच्या सांगण्याप्रमाणे होते. 'काय आहे' ('What is') ते बघा. त्याचे पूर्ण लक्ष देऊन अवलोकन करा, त्याकडे ध्यान द्या. हे करीत असताना मन पूर्णपणे तटस्थ ठेवावयाचे असते. साक्षित्वाची भूमिका पार पाडावयाची असते.

पूर्वग्रह, समजुती, विचार, निवाडे, थोडक्यात मन, यांची सफाई होण्यास या अवलोकनाची फार मदत होते. दृष्टी स्वच्छ होते, दूरदर्शी होते. कारण डोळ्यांवरील पटले दूर होतात. समाज परिवर्तनाच्या चळवळीत / कार्यात काही ध्येये बाळगून, एका विचारप्रणालीला (Ideology) बांधील राहून, कोणते तरी एक विश्लेषण पक्के मनात ठेवून क्रियाशील असणाऱ्यांच्या डोळ्यांवर अशी पटले विशेषच तयार होतात. सारखी तयार होतच असतात. अच्युतजींनी १९६६ नंतरच्या काळात वेळोवेळी दिलेल्या भाषणांच्या पुस्तिका चाळल्या तर त्यांची समज (Understanding) व दृष्टि (Perspective) यांच्यात पडलेला बदल त्यांनीच नोंदविलेला, आरेखित केलेला आढळतो.

समाजप्रवाहाच्या काठावर बसून घडामोडी न्याहळणे, नेत्याची भूमिका घेऊन, उडी टाकून, प्रवाहाला इष्ट वळण देण्याचा प्रयत्न करण्याचे कर्तव्य न पार पाडणे, असे याचे वर्णन करता येईल, नाही असे नाही. पण ते वर्णनही चुकीचे होईल. 'रोम जळत असताना नीरो फिडल वाजविण्यात दंग होता' तसला प्रकार इथे नव्हता. प्राप्त परिस्थितीत बाकी सगळे प्रश्न, शंका, ऊर्मी बाजूला सारून अमुक एक गोष्ट केलीच पाहिजे या कर्तव्याच्या हाकेला प्रतिसाद देऊनच रावसाहेब व अच्युतराव स्वातंत्र्यलढ्यात दाखल झाले होते. खाजगी जीवनाच्या कोषात स्वत:ला बंद करून न घेता, सार्वजनिक कर्तव्य पार पाडावयाचे ही भूमिका बदललेली नव्हती. पण आपण नेते आहोत व लोकांनाही / सहकाऱ्यांनाही आपले पुढारीपण हवे आहे म्हणून परिस्थिती अनेक अंगांनी बदललेली असताही, स्वत:च्या मनात असमाधान, शंका तीव्र होत असतानाही 'मागील पानावरून' (सवयीने वा आंधळेपणाने) पुढे चालू, असा प्रकार करीत राहावा याला तो नकार होता.

दृढनिश्चयाने, सहजतेने, आणि कोणाविषयी वा कशाविषयी मनात कटू भाव न बाळगता, स्वत:च्या आंतरिक गरजेपोटी,

पुढारीपणाच्या जंजाळातून मुक्त होऊन एक कर्तव्यदक्ष सामान्य नागरिक बनले. यात त्यांच्या वृत्तीतला निरलसपणा, त्यांची वैराग्यशीलता, त्यांची सुसंस्कृत शालीनता प्रकट झाली.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये सापेक्षत: ते अधिक सक्रीय झाले होते. साधारणपणे १९६५-६६ नंतर क्रमाक्रमाने त्यांची सक्रीयता वाढत गेली. अगदी अलिकडच्या चारदोन वर्षांमध्ये काही गोष्टी घडून याव्यात यासाठी स्वत: होऊन ते हालचाल करीत असे अनुभवाला आले.

कृष्णमूर्तींच्या "सांगण्या'शी, (त्यांची प्रवचने-संभाषणे यावर आधारित पुस्तके आधाराला घेऊन) काही एक घडवून आणण्यासाठी अच्युतजी मेत तेवढाही अभिक्रम विसंवादी ठरतो. कृष्णमूर्तींची एकेकट्या व्यक्तींशी जी संभाषणे होत तीही अनेक संपादित स्वरूपात प्रसिध्द झाली आहेत. जगात काय घडते आहे याकडे त्यांचे लक्ष होते, व त्यांना भेटावयास येणाऱ्या मंडळींच्या द्वारा त्यांना वर्तमानकाळातील विविध प्रवाहांची (trends) वऱ्यापैकी ताजी माहिती मिळत असावी. पण धोरणे, कार्यक्रम, कृती, चळवळ, संघटन या स्वरूपाच्या शिफारशी वा सूचना त्यांच्याकडून येत नसाव्यात. वास्तविक त्यांच्या निकटवर्तीयांमध्ये व्यवहारी जगातल्या बऱ्याच उच्चपदस्थ व क्रियाशील व्यक्ती होत्या, व त्यांचे बरेच काही चाललेले असे. तेव्हा पडद्याआड राहून प्रभाव टाकणे वा काही बदल घडवून आणणे हे त्यांना शक्य होते. पण आपल्या गोतावळ्यामधील कोणत्याच व्यक्तीला त्यांनी अडविले वा विशेष पुष्टी केली असे फारसे आढळत नाही. ते प्रश्न उपस्थित करीत, काही भेदक विश्लेषण करीत, 'जे आहे' त्यावर ध्यान देण्यास सांगत. काही विशेष प्रसंगी त्यांच्या प्रश्नांमधून त्यांची नाराजी व्यक्त होत असे. काही व्यक्तींच्या खाजगी जीवनाच्या संदर्भातील काही निर्णय/कृती याच्यांविषयी असे दिसते.

अच्युतजींच्या निधनानंतर प्रसिध्द झालेल्या एका माहीतगार माणसाच्या लेखावरून या तर्कास पुष्टी मिळते. चळवळीत, कार्यात उत्कटपणे झोकून द्यावे अशी वृत्ती हाही अच्युतजींच्या स्वभावप्रकृतीचा भाग होता. स्वत:च्या अंगची नेतृत्वाची क्षमता, कर्तृत्व यांची अच्युतजींना व्यवस्थित जाण होती. भूदान-ग्रामदान आंदोलनाने अच्युतजींना असे आकृष्ट करून घेतले होते, पण कृष्णमूर्तींनी मोडता घातला, असा उल्लेख त्या लेखात होता. १९५० नंतर असे किती प्रसंग आले याची माहिती नाही. पण कृष्णमूर्तींना या पातळीची क्रियाशीलता रूचणारी नाही याचे भान व काही प्रमाणात दडपणही वाटावे, याचे बंधन पडावे इतका कृष्णमूर्तींच्या जवळकीचा प्रभाव अच्युतजींवर कृष्णमूर्तींच्या हयातीत होता का ? होकारार्थी उत्तर देण्याकडे माझा कल होतो.

अर्थात १९६५ नंतरच्या काळात वयाची साठी पण ओलांडलेली होती.. आणि जमाना पण इतका बदललेला होता की, अच्युतजींकडे ज्येष्ठ नागरिकाची भूमिका चालून आली. यानंतरच्या काळात त्यांनी वेळोवेळी जी व्याख्याने दिली त्या व्याख्यानांचे दोन भाग पडतात असे स्थूलमानाने दिसते. पूर्वीच्या आपल्या कोणत्या समजुती, कोणते विश्लेषण व कोणते निष्कर्ष चुकले त्याचा ते आवर्जून ऊहापोह करताना आढळतात. आणि मग यापुढच्या काळात कोणत्या गोष्टी करण्यावर आपण भर देणे का आवश्यक आहे त्याचे विवेचन करतात.

पण त्यांची सक्रीयता एवढ्यावरच थांबली असे नाही. ज्या बाबी त्यांना विशेष व तीव्रपणे खटकत, लोकहिताच्या विरोधी वाटत त्या बाबींच्या बाबतीत परिचित उच्चपदस्थांपैकी योग्य त्या व्यक्तीपर्यंत ते आपली मते पोचवीत व कोणती कृती केली पाहिजे तेही सुचवीत. पंतप्रधान इंदिरा गांधी आणि जयप्रकाश यांच्यातला संघर्ष जसा उग्र होत चालला, तो धसाला लागत गेला तशी यातून सन्माननीय प्रतिष्ठित मार्ग निघू शकतो का हे पाहण्यासाठी अच्युतजींनी इंदिरा गांधीची भेट घेऊन जयप्रकाशजींना पत्र लिहिले, ही गोष्ट आज माहीत झाली आहे. या प्रकारची सक्रीयता त्यांची अन्य प्रसंगीही प्रकट होत राहिली. नर्मदा नदीवर बांधल्या जात असलेल्या सरदार सरोवर व अन्य महाकाय धरणांची उंची कमी करून पर्यावरणाचा विनाश कमी करावा, विस्थापितांची संख्या आटोक्यात ठेवावी यासाठी त्यांनी असेच प्रयत्न केले होते. हातमाग विणकर फार मोठ्या संख्येने बेकार होत आहेत, त्यांना संरक्षण दिले पाहिजे असेही त्यांचे मत त्यांनी योग्य व्यक्तींपाशी व्यक्त केले होते.

एखादा मुद्दा घेऊन जनआंदोलन वा विधायक कार्याचा मोठा प्रकल्प उभारण्याची प्रत्यक्ष जबाबदारी स्वीकारण्याच्या परिस्थितीत आपण नाही याची त्यांना कधी कधी मनोमन खंत वाटत असावी. नेतृत्वाचे अव्वल दर्जाचे गुण व कौशल्य त्यांच्या ठायी असल्याने, महत्वाचे मुद्दे उपस्थित करणाऱ्या व्यक्ती प्रभावी आंदोलन उभे करू शकत नाहीत, देश 'पेटवू' शकत नाहीत हे पाहून त्यांचे रक्त सळसळत असे. देशव्यापी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सेनापतीने कसे वागावे, कोणते धोरण ठेवावे, आणि कोणती पथ्ये सांभाळावीत यासंबंधी, योगायोगाने गाठ पडल्यावर, मेधा पाटकर यांच्याशी अच्युतजींचे संभाषण ऐकत असताना याचा अनुभव आला.

७

त्यांच्या आस्थेच्या विषयांसंबंधी त्यांची समज व दृष्टी, त्यांचा विचार, इष्ट कृती-कार्यक्रम या विषयीची मांडणी याकडे वळण्याआधी एक मुद्दा हातावेगळा करावयास हवा.

अच्युत पटवर्धन हे समाजवादी चळवळीचे एक प्रमुख नेते, या चळवळीतल्या तरुणतरुणींचे हिरो होते. त्यांचे धारदार युक्तीवाद ऐकणाऱ्यास दिपवून टाकत. त्यांच्यापासून पक्षातील कार्यकर्त्यांच्या फार मोठ्या अपेक्षा होत्या. त्यांनी पक्ष सोडला तेव्हा त्यांच्या वागण्याचा अर्थ लावणे फार अवघड गेले असणार. अनेकांची वैतागवाडी पण झाली असणार. 'अध्यात्माकडे वळले' हे स्पष्टीकरण हिंदू सांस्कृतिक परंपरेत चपखल बसणारे होते. 'संसारातून उठून जाणे' ही गोष्ट आपल्याकडे परिचित होती.

अच्युतजींच्यानंतर तीन एक वर्षांनी जयप्रकाशांनी भूदान आंदोलनाला स्वत:चे जीवनदान दिले. समाजवादी कार्यकर्त्यांना हा आणखी एक मोठा धक्का होता. जयप्रकाशांवर या कारणाने पक्षातले नेते कार्यकर्ते यांचा खोलवर राग होता. १९७४ नंतर जयप्रकाश परत राजकारणात उतरले तेव्हाच तो खऱ्या अर्थाने निवळला.

अच्युतजींवरही समाजवादी नेते व कार्यकर्ते यांचा असाच खोलवर राग होता. नंतरच्या काळात रागाच्या निखाऱ्यांवर बरीच राख साचली. पण १९७० च्या आसपास अच्युतजींच्या वक्तव्यांमधून समाजवादी विचारप्रणालीवर टीका येऊ लागली. समाजवादी पक्षात जी स्थित्यंतरे घडून येत गेली, जे नवनवे अवतार या पक्षाने धारण केले त्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करण्याइतकीही गंभीरपणे त्यांची दखल घ्यावी असे त्यांना वाटले नाही. कसेही करून काँग्रेसला, इंदिरा गांधींना सत्तेवरून खाली खेचण्यावर भर देणारे राजकारण अच्युतजींना अत्यंत विकारवश, बालिश वाटत असे. लढ्यांसाठी मुद्दे शोधत राहणाऱ्या व आंदोलनांवर भर देणाऱ्या (agitational politics) राजकारणाला त्यांची प्रतिक्रिया तीव्र येई. या कारणाने समाजवादी चळवळ व अच्युतजी यांच्यातले अंतर वाढले. वैयक्तिक स्नेह जो काही काही व्यक्तींशी राहिला असेल तो असेल. पण अच्युतजी आता समाजवादी राहिले नाहीत असा निवाडा बहुतेकांनी केला.

पुढे तर अच्युतजी 'नवहिंदुत्ववादी' झाले अशी भावना महाराष्ट्रात बोलून दाखविली जाऊ लागली. आणीबाणीनंतर जनसंघासह समाजवाद्यांनी एक पक्ष स्थापन केला. पण 'दुहेरी निष्ठे'च्या मुद्यावर हे राजकीय लग्न मोडले. त्यानंतर रा.स्व. संघ - जनसंघीय मंडळींविषयी कटुता वाढली. नेमक्या या काळात, उत्तरप्रदेशातील गोंडा जिल्ह्यात श्री नानाजी देशमुख यांनी ग्रामविकास व पुनरुत्थानाचा जो जिल्हाव्यापी कार्यक्रम हाती घेतला होता त्याने अच्युतजी फार प्रभावित झाले. त्यांचे कौतुक जाहीरपणे करू लागले. समाजवादी, हिंदुत्ववादी, पुरोगामी, प्रतिगामी अशी लेबले डकवून, आयडियोलॉजीची झापडे लावून वर्गीकरण करणे व्यर्थ आहे, भारतीय समाजाचे उत्थान घडवून आणण्याचे कार्य निष्ठेने व कार्यक्षमतेने करणे महत्वाचे आहे, असे यात सूचन होते. रा.स्व. संघ ही एक देशव्यापी [illegible] सुदृढ संघटना जर नवे वळण घेईल तर नव भारत उभारणीसाठी मोठी शक्ती कामी लागेल; नानाजी देशमुख रा.स्व. संघाला असे नवे वळण देऊ शकतील, असा विश्वास अच्युतजींना वाटत असावा. इतके मात्र खरे की, रा.स्व. संघीय - पूर्वाश्रमीच्या जनसंघीय मंडळींविषयी अच्युतजी या काळात स्वागतशील व उदार बनले होते. अच्युतजींच्या वागण्या - बोलण्यामुळे समाजवादी मंडळींना जखमेवर मीठ चोळल्यासारखे वाटले असल्यास नवल नाही.

त्यांच्या निधनापूर्वी काही दिवस अच्युतजींनी स्वत: पुढाकार घेऊन समाजवादी चळवळीत सक्रीय असणारे त्यांचे जुने सहकारी व चाहते, तसेच नंतरच्या पिढीतील काही वेचक मंडळी यांना आवर्जून भेटीसाठी बोलावले होते. मृत्यूची सावली चांगलीच गडद होत आल्याचे त्यांना माहीत होते; फार तर तीन चार महिन्यांचे आयुष्य उरले आहे असे ते म्हणालेही होते. या काळात काही गोष्टींची सुरूवात करून द्यावी अशी त्यांची इच्छा होती. मुंबईत झालेल्या या भेटीमुळे मधल्या काळातील अंतराय पुष्कळसा दूर झाला. त्यांच्या निधनानंतर त्यांना वाहिलेल्या आदरांजलींमधून याचा प्रत्यय येतो.

रामजन्मभूमी - बाबरी मशीद या मुद्यावरून सत्तेचे हीन राजकारण उपस्थित केले गेले. या वेळी आपण ज्यांच्याबद्दल उदार व स्वागतशील वृत्ती धारण केली, त्यांनी ठाम विरोधी भूमिका घेतली तर नाहीच; उलट, बाबरी मशीद तोडून (वा हलवून) तेथे राम मंदिर उभारण्याच्या राजकारणाचे समर्थनच केले गेले, असे अच्युतजींनी पाहिले. त्यांचा यामुळे निश्चितच भ्रमनिरास झाला. अनेक प्रकारचे रचनात्मक कार्यक्रम राबवीत असतानाही संकुचित व घातक जमातवादी उद्दिष्ट हेच मध्यवर्ती राहिले आहे हेच प्रत्ययाला आले. सावरकर, भाजपा, रा.स्व. संघ यांच्या अर्थाने अच्युतजी कदापीही हिंदुत्ववादी बनणे अर्थातच शक्य नव्हते.

तर मग अच्युतजींचे वर्गीकरण कसे करावयाचे?

प्रत्येक गोष्ट, भूमिका यांना नाव देऊन, लेबल डकवून वर्गीकरण करण्याची प्रवृत्तीच अच्युतजींनी त्याज्य मानली होती. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीतला हा एक गाभ्याचा मुद्दा आहे. नामकरण, वर्गीकरण यामुळे गोष्टी, माणसे, भूमिका साच्यात बंदिस्त होतात; त्यांचे ताजेपण, प्रवाहीपण नष्ट होते. वर्गीकरणात अडकून पडायला अच्युतजी तयार नव्हते. 'समाजवादी' अशी स्वत:ची ओळख एके काळी आपण देत होतो ही गोष्ट त्यांनी कधीच नाकारली नाही. उलटपक्षी, त्यावेळच्या अर्थाने आपण आज समाजवादी नाही, व समाजवादाचा तो आकृतिबंध सर्वांनीच त्याज्य मानावा, अशी स्पष्ट मांडणी ते करीत.

जातजमातभेदविरहित, स्पृश्यास्पृश्यतेविरहित, शोषणमुक्ती,

समता यांवर आधारलेली विज्ञान - तंत्रविज्ञान डोळस उपयोग करून बनलेली भौतिक दृष्ट्या समृध्द समाजव्यवस्था भारतात निर्माण करण्याचे ध्येय त्यांनी सोडले नव्हते. या अर्थाने ते 'लोकशाही समाजवादी' मूल्यांशी एकनिष्ठच राहिले.

या मूल्यांवर समाजवाद्यांची मक्तेदारी अर्थातच नाही. किंबहुना दीर्घकाळापर्यंत ही मूल्ये बाळगणे हे समाजवादी असण्याचे व्यवच्छेदक लक्षण मानले जात नव्हते. आजही स्वत:स आग्रहाने समाजवादी म्हणणारे ही मूल्ये मानणे (वा जीवनात अंगीकारणे) पुरेसे मानणार नाहीत अशी शक्यताच जास्त आहे.

शेती, उद्योग व व्यापार या क्षेत्रांमध्ये उत्पादनाची साधने खाजगी मालकांच्या हाती असायला हरकत नाही वा खाजगी उद्योजकांना या तिन्ही क्षेत्रांमध्ये वाव असावा अशी भूमिका घेणाऱ्या व्यक्तीस समाजवादी कसे म्हणायचे, असा प्रश्न आजही उपस्थित केला जाईल. केंद्रीकृत राज्यसत्तेचे अर्थव्यवस्थेवर प्रभुत्व व नियंत्रण, सर्वंकष नियोजन, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये शासनाचा हेतूंच्या पूर्ततेच्या दृष्टीने (purposive) हस्तक्षेप, राज्यसत्तेचा जास्तीतजास्त वापर करून इष्ट दिशेने समाजाची फेररचना ही लक्षणे व्यवच्छेदक मानणाऱ्यांनाच समाजवादी म्हणावे असेच आजही बहुसंख्यांचे मत पडेल. आदर्श व परिपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करणे व ती टिकवून धरणे ही राज्यसत्तेची जबाबदारी आहे ही भूमिका समाजवादाची भूमिका म्हणून बहुधा आजही ओळखली जाईल.

या शिवाय समाजवाद ही जडवादी (materialistic), ईहवादी (secular) विचारप्रणाली आहे अशीही मान्यता आहे. 'धर्म ही अफूची गोळी आहे' अशी मांडणी करून शासकीय दंडसत्तेच्या बळावर धर्माचा उच्छेद करण्याची भूमिका जरी समाजवादी घेत नसले तरी, सामान्यत:, धर्म ही आधुनिक युगात एक अनावश्यक व कालबाह्य बाब आहे, ती भ्रामक व घातक परिणाम करणारीच अधिक आहे, ती एक अंधश्रध्दाच आहे असेच शिष्टसंमत मत आढळते. अध्यात्माचेही म्हणून समाजवादाला वावडे आहे. विज्ञान-तंत्रविज्ञानाचा आधार पुरेसा आहे अशीही ठाम भूमिका आहे. मानवी मन, मानवी समाज, नीती, संस्कृती, शिक्षण, बालसंगोपन, स्वास्थ्य हे सर्व विज्ञानाचे विषय असून, या क्षेत्रांमध्ये विकसित झालेल्या शास्त्रांच्या नियम-निष्कर्षांनुसार रचना करणे, व्यवस्था लावणे हाही समाजवादी पुनर्रचनेचा एक अविभाज्य भाग मानला जातो.

१९३४ ते १९५० या काळातही या कसोट्यांवर अच्युतजींना समाजवादी पूर्णार्थाने म्हणता आले असते की नाही, शंका आहे. थिऑसफीचा खोलवर रुजलेला संस्कार आडवा येत असणार. पण १९५० नंतर समाजवादी मूल्यांवरील निष्ठा कायम राहिली तरी, वरील आकृतिबंधात केली जाणारी समाजवादाची मांडणी त्यांनी उत्तरोत्तर जास्तच नाकारली.

८

१९७३ साली अच्युतजींनी फिरोज गांधी स्मृति व्याख्यान दिले. एक समाजवादी ह्या भूमिकेमधूनच त्यांनी हे व्याख्यान दिले असे दिसते. भारतीय समाज, भारतीय मानस, येथील परिस्थिती व प्रश्न लक्षात घेता समाजवाद्यांनी कोणत्या गोष्टींवर भर द्यावयास हवा या विषयीच त्यांचे विवेचन आहे. भारतीय माणसाचे मानस वर्गीय जितके आहे त्यापेक्षा ते जातजमातीय, प्रादेशिक आहे, आणि समाजवाद साध्य करण्यातला हा अडसर आहे, असे ते म्हणतात. समाजातले स्थान, दर्जा, प्रतिष्ठा याचे भारतीय माणसाला महत्व आहे. सामाजिक दृष्ट्या अर्थपूर्ण कार्य करण्याची, समाजहित साधण्याची जबाबदारी चोख पार पाडण्यावर दर्जा, प्रतिष्ठा या गोष्टी या समाजात अवलंबून नसतात. त्या पदाशी, स्थानाशी जोडलेल्या असतात. सामाजिक मालमत्तेचा सांभाळ व संरक्षण करण्याविषयी भारतीय माणसे बेफिकीर असतात. राष्ट्रीय वा सार्वजनिक मालमत्तेच्या विध्वंसाचे खंडन कोणी ठामपणे करीत नाही. या गोष्टींकडे लक्ष वेधून अच्युतजी म्हणतात, "Basic to this analysis is the recognition that socialism is a meaningless word unless it carries with it a deep sense of social obligation."
(सामाजिक बांधिलकीची जाणीव खोलवर मुरलेली नसेल तर 'समाजवाद' ही एक अर्थशून्य संकल्पना ठरते या गृहितावरच वरील विवेचन बेतलेले आहे.) तळागाळाच्या अंत्यज माणसांच्या उत्थानाविषयी आंतरिक जिव्हाळा आपल्या सार्वजनिक जीवनामध्ये आढळत नाही, यावर ते बोट ठेवतात.

गांधीजींचा उल्लेख करून त्यांनी मग, भारत खऱ्या अर्थाने खेड्यांमध्ये वसतो, आणि या खेड्यांमध्ये काय घडते त्यावरच आर्थिक विकास व सामाजिक न्याय साध्य होणार की नाही हे अवलंबून आहे; तसेच, सर्वात तळाच्या माणसांची स्थिती किती सुधारते हीच एकमेव कसोटी मानली पाहिजे, अंत्योदयापासून आरंभ केला पाहिजे, असे म्हणावे हे ओघानेच आले. दारिद्र्यरेषेखालील हा समाज आणि संघटित उद्योगधंद्यामधील कामगार यांच्या स्थितीत असलेल्या अंतराकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. शहरी कामगार व कर्मचारी वर्ग आणि खेड्यातील शेतकरी समाज यांच्या विषम स्थितीकडे लक्ष वेधले आहे. औद्योगीकरण व शहरीकरण या प्रक्रियांमुळे उत्पन्न झालेल्या समस्यांचा ऊहापोह केला आहे. अस्पृश्यतेच्या उच्चाटनाकडे झालेल्या दुर्लक्षावर बोट

ठेवले आहे.

समाजातल्या अगदी तळाशी असलेल्या समाजघटकांविषयीचे कर्तव्य पार पाडण्याविषयी लोकांना जागृत करण्यास, मानस बदलण्यास असें मध्यवर्ती स्थान व महत्व देण्यात अच्युतजींचे वेगळेपण दिसून येते.

शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांमध्ये राष्ट्रीयीकरण, जमिनीचे फेरवाटप, जमीन मालकी, उत्पन्न यांच्यावर कमाल मर्यादा यांना ते विरोध करीत नाहीत. पण या उपाययोजनांच्या मर्यादा ते दाखवून देतात. महत्वाची गोष्ट अशी की, राष्ट्रीय उत्थानाची समस्या, समाजवादी समाजाच्या निर्मितीचे आव्हान यांचे समीकरण ते साम्यवादी वा समाजवादी पक्ष सत्तेवर येण्याशी किंवा अधिकाधिक गोष्टी सरकारने ताब्यात घेण्याशी घालीत नाहीत. ज्या कार्यक्रमात खाजगी उद्योजक, नागरिक स्वेच्छ्या जाणीवपूर्वक सहभागी होतील असा शासकीय अभिक्रम व नियंत्रण यांच्याहून स्वायत्त अशा व्यापक पायावर अधिष्ठित अशा रचनात्मक उपक्रमाची आवश्यकता ते प्रतिपादतात.

खेड्यांचा कायापालट करण्यासाठी जमीन, जंगल, पाणी ही संसाधने यांची उत्पादक क्षमता वाढविण्याची, ती समृध्द बनविण्याची निकड त्यांनी प्रतिपादलेली आढळते. या व्याख्यानात त्यांनी भूमी वृक्षांनी आच्छादित करून हरित करण्याची गोष्ट केलेली आढळते. या संदर्भात ते म्हणतात, "All these activities would stimulate and sustain employment by diverting private wealth towards repairing ecological damage... Basic to this proposal is an uneasy feeling that those whose wealth is slashed by ceiling laws have no faith that the state can be trusted to utilise the money thus collected with any sense of sanctity for a scarce social resource. Therefore this proposal gives the taxpayer an option to gift his entreprenure skills and to ensure fullest utilization of the funds he spends for national rehabilitation... All this nationwide campaign should be totally free from the apronstrings of government initiative. ....Such a voluntary programme without the political parties or civilians dominating the show could bring new vitality to our rural life. Any social work that remains out of the vortex of election politics will bring a healthier tone to our national life." *(ह्या सर्व कार्यक्रमांमुळे खाजगी संपत्तीचा ओघ पर्यावरणाची हानी भरून काढण्याच्या दिशेकडे वळेल आणि ह्या योगे व्यवसायांची निर्मिती व जोपासना होईल.... कमालधारणाविषयक कायदे करून शासन जो करते त्याचा विनियोग एखाद्या तुटपुंज्या सामाजिक साधनस्रोतासाठी करताना शासन सचोटी दांखवील असा विश्वास अशा कायद्यांमुळे ज्यांच्या संपत्तीवर घाला पडतो अशांना अजिबात नाही, ह्या काहीशा अस्वस्थ करणाऱ्या जाणिवेपोटी अशा योजना सुचविल्या जातात. म्हणूनच तर या योजनेद्वारे करदात्याला असं सुचवावंसं वाटतं की त्याने त्याच्या उद्यमशीलतेतील कौशल्याचं योगदान ह्या कार्यक्रमाला द्यावं आणि निधीचा विनियोग राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी होतो आहे ह्याविषयी जागरूक रहावं... ही देशव्यापी मोहीम शासनाच्या पुढाकाराच्या छत्रापासून पूर्णपणे मुक्त ठेवायला हवी... राजकीय पक्ष आणि हितसंबंधी नागरिक यांच्या प्रभावापासून मुक्त असणाऱ्या असल्या स्वयंसेवी कार्यक्रमांमधून ग्रामीण जीवनाला एक नवा जोम प्राप्त होईल. निवडणुकीच्या राजकारणाच्या भोवऱ्याबाहेर राहून केलेल्या कोणत्याही समाजकार्यामुळे राष्ट्रीय जीवनास एक निरोगी रंग चढेल.)*

रूढ पोथीनिष्ठ समाजवादी भूमिकेपेक्षा ही भूमिका गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेच्या तसेच विनोबांच्या संपत्तीदान, समयदान इत्यादि दानांच्या कल्पनेच्या जवळ येणारी आहे.

याच व्याख्यानात शूमाकवर यांच्या 'समुचित तंत्रज्ञाना'च्या (appropriate technology) अंगिकाराची अच्युतजींनी शिफारस केलेली आढळते. काहीशी नवलाची गोष्ट अशी की, निसर्गाची छेडछाड करण्याचा अपराध, पर्यावरणाच्या स्वास्थ्याची व संतुलनाची उपेक्षा हा आजचा यक्षप्रश्न आहे, हा नीट सोडविण्यावर मानवजातीचे अस्तित्व भविष्यात अवलंबून आहे असे ते म्हणतात.

या व्याख्यानाला कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचाही स्पर्श झालेला आढळतो. वास्तवाकडे स्वच्छ, निर्मळ दृष्टीने साक्षात अवधान दिले तर मर्मदृष्टी, सम्यक समज प्राप्त होते असे ते म्हणतात. भौतिक परिस्थितीवर ताबा प्रस्थापित करण्यात, हवी तशी ती घडविण्यात आपण यशस्वी होऊ शकलो, पण माणूस जर स्वार्थी, विकारी, संकुचित राहिला तर सगळे व्यर्थ ठरणार आहे. या अर्थाने माणसाने स्वत:च्या अंतर्यामी ध्यान केंद्रित करण्याची, मानव असण्याचा अर्थ काय, मानवी जीवनाचे श्रेय कशात आहे ते जाणण्याची गरज आहे. या बाबतीत भारतीयांना थोर व मौलिक वारसा लाभलेला आहे. अखेरीस ते म्हणतात,"This insight into the meaning of man is our most priceless heritage— Indian socialism must be rooted in this thousands of years' ethos of this land... It is the exploration of inner space that gives man a glimpse of his destiny... Unless Indian culture is reintegrated with this timeless search of man it cannot hope to become the signpost

meaningful future, for India or anywhere else."

(मानवी अस्तित्वाचा अर्थ शोधणारी सूक्ष्मदृष्टि हाच आपला सर्वात बहुमोल वारसा आहे. भारतीय समाजवादाची मुळं हजारो वर्षांच्या परंपरेने जोपासलेल्या ह्या भूमीच्या संस्कृतीमध्येच रुजायला हवीत.... अंतरीच्या अवकाशाचा वेध घेत असतानाच मानवाला त्याच्या भवितव्याचं ओझरतं दर्शन घडू शकतं... जोपर्यंत भारतीय संस्कृती आणि मानवाचा हा सार्वकालिक ध्यास यांचा मिलाफ घडून येत नाही तोपर्यंत भारतात किंवा अन्यत्र, अर्थपूर्ण भविष्याचे दिग्दर्शन करण्याचे कार्य भारतीय संस्कृती पार पाडू शकणार नाही.)

'व्यवस्था परिवर्तना'वर लक्ष व शक्ती केंद्रित करणारी समाजवादाची रूढ मांडणी व वर्गसंघर्षावर, सत्तासंपादनावर भर देणारी समाजवादी राजकारणाची रूढ मांडणी यांच्यापासून कोणत्या व किती वेगळ्या दिशेने एक समाजवादी म्हणून अच्युतजींची वाटचाल चालली होती याची आता कल्पना येऊ शकेल.



९

जून १९७५ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी पुकारून एकाधिकारवादी राजवट प्रस्थापित केली. अच्युतजी या घटनेने व्यथित झाले. पुणे विद्यापिठाने १९७६ साली त्यांना सेनापती बापट व्याख्यानमाला गुंफण्यासाठी बोलावले तेव्हा त्यांनी 'स्वातंत्र्य' हाच विषय निवडला.

इंदिरा गांधींच्या सर्वाधिकारशाहीमागील युक्तीवाद त्यांनी खोडून तर काढलाच पंण स्वातंत्र्याचे विवेचन त्यांनी तेवढ्या मर्यादित ठेवले नाही.

प्रथमत: 'स्वच्छंद' व 'स्वतंत्र' यात त्यांनी फरक केला. पाश्चात्य वळणाने स्वातंत्र्याचा जो विचार होतो तो मुख्यत: स्वच्छंदतेच्या अंगाने होतो. अच्युतजींचे प्रतिपादन असे की, 'स्वच्छंद वर्तन आणि स्वतंत्र जीवन... या दोन परस्परविरोधी जीवनचर्या आहेत. स्वच्छंदपणामध्ये वासनांचे आणि आवडीनिवडींचे दास्य अभिप्रेत आहे... स्वातंत्र्य ही मानसिक अवस्था लाभण्यासाठी माणसाला आपल्या पूर्वग्रहांची, संस्कारांची, प्रेरणा-प्रतिक्रियांची जाणीव असणे आवश्यक आहे.'

माणूस हा समाजात राहणारा प्राणी आहे याचा अर्थ माणसाच्या स्वातंत्र्याचा आशयच समाजहिताशी संबध्द आहे असे म्हणून 'सामाजिक शीलाची समस्या' नवसमाज निर्मितीच्या केंद्रस्थानी अच्युतजी प्रस्थापित करतात.

विज्ञान-तंत्रविज्ञान यांचा विकास झालेला नव्हता व त्यामुळे सर्व माणसांना भौतिकदृष्ट्या समृध्द जीवन प्राप्त होणे अलिकडेपर्यंत शक्य नव्हते. किंबहुना, 'उत्पादनशक्ती'चा विकास करण्यासाठी, संस्कृती व सभ्यता यांच्या निर्मितीसाठी शोषण, दडपणूक, अन्याय यावर आधारित विषम व वर्गीय समाजरचना अनिवार्य होती अशी मार्क्सवादी मांडणी आहे. सामाजिक शीलाचा प्रश्न अशा रीतीने रूढ पोथीनिष्ठ मार्क्सवादामध्ये 'उत्पादनशक्ती'च्या पर्याप्त विकासाशी आणि, तसे ते विकसित झाल्यावर अटळपणे राज्यक्रांतीद्वारा कामगारवर्गीय राज्यसत्ता प्रस्थापित होण्याशी जोडलेली आहे. सामाजिक शील निर्माण करणे ही स्वतंत्र समस्या आहे हेच मुळी नाकारलेले आहे.

विज्ञान-तंत्रविज्ञान यांच्या आधारे तत्वत: सर्वांसाठी भौतिक समृध्दी, वैपुल्य निर्मितीची क्षमता प्राप्त केल्यावरही, व्यवस्था भांडवलशाहीची असो वा समाजवादी/साम्यवादी, राज्यसत्तेची असो, सामाजिक शीलाची समस्या स्वतंत्रपणेच सोडवावी लागते हा गेल्या पन्नासपाऊणशे वर्षांच्या ऐतिहासिक अनुभवातून आपण बोध घेतला पाहिजे असे अच्युतजींचे म्हणणे आहे.

माणसांच्या स्वातंत्र्याचा संकोच करून, त्यांना शिस्त लावून शील निर्माण करण्याची भूमिका आणीबाणीचे समर्थक घेत होते. ती अव्हेरताना अच्युतजी म्हणतात, 'सामाजिक शीलाच्या मुळाशी नैतिक शक्तीचा आधार असावा लागतो. ही नैतिकता व्यापक लोकहिताची आणि आर्त परित्राणाची आहे.' बाह्य परिस्थिती (समाजरचना व व्यवस्था) बदलली की सामाजिक शील निर्माण होईल या भूमिकेचा प्रतिवाद

करताना ते म्हणतात, 'परिस्थितीचा सुंभ जळला तरी मनोवृत्तीचा पीळ जात नाही.' अच्युतजींच्या मते 'मनोवृत्ती हा अंतिमत: कारक (causative)घटक आहे.'

व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण व संवर्धन यांमधून सामाजिक शील कसे निर्माण होईल, हा मग खरा प्रश्न उपस्थित होतो. येथे अच्युतजींचे विवेचन कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या अनुषंगाने पुढे सरकते. माणूस स्वच्छंद वर्तनालाच स्वतंत्र जीवन समजतो. पण स्वच्छंद वर्तन हे माणसाच्या दास्याला कारणीभूत होणारे असते; नव्हे, वासनाविकाररूपी 'सहजप्रवृत्तीं'चे दास बनण्यामधूनच स्वच्छंद वर्तन घडत असते. या दास्यामधून मुक्त होण्यानेच माणूस खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनतो.

अच्युतजींच्या मांडणीच्या मुळाशी एक महत्वाचे गृहीतकृत्य आहे. आपण जिवंत राहतो, लहानाचे मोठे होतो, माणूसपण प्राप्त होते ते वात्सल्याने, कर्तव्यपूर्तीच्या भावनेने कोणी ना कोणी आपला सांभाळ केलेला असतो म्हणून. समूह जीवन परस्पर सहकार्याच्या आधारेच विकसित होते, टिकून राहते. ही प्रचिती प्रत्येक प्रौढ व्यक्तीला कमीअधिक प्रमाणात आलेली असते. म्हणून अच्युतजी म्हणतात, 'जवळ जवळ प्रत्येक मुलात वात्सल्य व सद्भावना यांच्या अमूर्त जाणिवा रुजत जातात. ज्या अनेक प्रत्यय-आत्मप्रत्ययातून हे घडते त्याचे जाणीवपूर्वक स्मरण वा बोधन त्याला नसते. एका माणसाला दुसऱ्या माणसाविषयी वाटणारी मूलभूत सद्भावना ही तर्कसिध्द घटना नाही. माणसांना एकमेकांविषयी वाटणारी सद्भावना हाच सामाजिक शीलाचा स्थायी आधार आहे.'

वासना - विकारांचा माणूस दास बनतो तेव्हा या सद्भावनेला क्षती पोहोचते; ती खोलवर दडपली जाते. या दास्यातून मुक्त होणे म्हणजे स्वतंत्रही होणे, आणि स्वत:च्या सामाजिकतेचे खरे स्वरूप व आशयही जाणणे होय.

स्वत:चे मनोव्यापार व वर्तन यांच्याकडे तटस्थ, अनासक्त साक्षित्वाच्या भूमिकेतून पाहण्याची क्षमता माणसात आहे. आंतरिक व बाह्य परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती असलेल्या या क्षमतेला उद्देशून 'अवधान (देण्याची क्षमता)' (attention) हा शब्द अच्युतजींनी कृष्णमूर्तींना अनुसरून योजिला आहे. ते म्हणतात, 'आपण ज्या परिस्थितीच्या चक्रव्यूहात गुंतलो आहोत ती आपणच तयार केली आहे हे भान माणसाला होणे हे त्याच्या जाणिवेला मिळालेले एक असाधारण आव्हानच असते.' ते पुढे म्हणतात, 'तांत्रिक वैज्ञानिक प्रगतीला जो आत्मविनाशकारक प्रवृत्तींचा अभिशाप लाभलेला आहे त्याचे गूढ समजण्यासाठीसुध्दा मनोवृत्तींचे अवधान हेच एक महत्वाचे साधन आहे. या दृष्टीने माणसाला आपल्या सर्व प्रेरणा - प्रवृत्तींची वस्तुनिष्ठ व यथार्थ जाणीव होणे हीच स्वातंत्र्याची एक नवी दिशा आहे. आजपर्यंत मानवी संस्कृतीच्या विकासात स्मृतिशक्तीला अग्रमान होता; पण अवधानाची महती स्मृतीहून अधिक आहे. प्राप्त होणारे लाभ स्मृतिशक्तीसारखे सुखोपभोगांचे करण्यासाठी उपयुक्त ठरत नाहीत. अवधान ही एक सम्यक् दृष्टी आहे. जे आहे - जसे आहे -, तसेच अविकृत रीतीने पाहण्याची ती एक हातोटी आहे... माणसांची द्वेषबुध्दी प्राधान्येकरून त्याच्या मानसिक प्रक्रियांचा परिपाक आहे. दुसरा माणूस आपल्याला दु:ख देत आहे, त्या दु:खाचा स्वीकार न करता आपणच दुसऱ्याला दु:ख देण्याच्या प्रक्रियेची संथपणे अवधानपूर्वक समीक्षा केली, तितिक्षेने तिच्या वास्तवतेचे स्वरूप ध्यानी घेतले, तर तिचे दमन किंवा पोषण न करता केवळ तिच्याबद्दलच्या पूर्ण भानामुळे ती वृत्ती जशी उद्भवते, तसेच तिचे निरसनही होते... द्वेषक्रोधाच्या उर्मींच्या सम्यक् अवधानामधून जी समज येते ती म्हणजे केवळ शाब्दिक ज्ञान नाही.'

'मानवसमाज आणि व्यक्तिमात्र अंगभूत कर्तृत्वाचा गैरवापर करून आपल्यावरच अपार अरिष्टे ओढवून घेत आहे. त्या व्याधीवर उपाय योजना शोधून काढणे ही आजच्या जमान्याची तीव्र निकड आहे,' असे म्हणून अच्युतजी पुढे म्हणतात, 'आजही इष्ट आणि अनिष्ट या कसोटीवर आचरण आधारणारा माणूस इच्छाशक्तीच्या निर्धाराच्या (Will) जोरावर जो मार्ग आचरीत असतो त्यात वरवर सामाजिक नीतीची भूमिका मजबूत होत आहे असे भासते. तरी पण मानवाविषयीची आंतरिक जवळीक, जिव्हाळा, आस्था या सहज वृत्तीचा उद्रेक या भूमिकेत दिसत नाही. म्हणूनच या शील साधनेतून मानवकल्याणाच्या वृत्तीचे पोषण होत नाही. म्हणून अवधानाचा एकमेव मार्ग आपल्यापुढे उरतो.'

इच्छाशक्तीच्या निर्धाराच्या पायावर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमधून स्वतंत्रता, मुक्ती पावण्यातली असमर्थता, 'स्मृती'च्या, म्हणजे भूतकाळाच्या पकडीत असेतोवर आवर्तात / भोवऱ्यात अडकून पडण्याची अपरिहार्यता, आणि अवधानातूनच मुक्ती मिळते हा प्रत्यय हे खास कृष्णमूर्तींचे सांगणे आहे.

सापाला दूध पाजले तर तो पुष्टही होतो आणि त्याच दुधाचे विषही तयार होऊन त्याच्या दातात साठते. याला सापाचा काही इलाज असत नाही. याला उद्देशून 'सर्प-प्रवृत्ती' असा शब्द अच्युतजींनी याच, १९७६ च्या व्याख्यानात वापरला आहे. ते म्हणतात, 'माणसांच्या वैयक्तिक, संस्थात्मक आणि सामूहिक जीवनात एक सर्प-प्रवृत्ती आहे. आत्मकेंद्रित भावनेने ती सतत जोपासली जाते. तिचीच कराल- भीषण अभिव्यक्ती म्हणजे आजच्या जगातील आसुरी शस्त्रास्त्रसंभार आणि संहारक संघटना. (इराकचे सद्दाम हुसेन व अमेरिकेचे जॉर्ज बुश हे दोघेही या प्रकारच्या आत्मकेंद्रित सर्प-प्रवृत्तीचे प्रतीक म्हणता येतील. 'द्वेषप्रवृत्तीला कर्तृत्वाची धार चढली' की होणाऱ्या अनर्थाचेही प्रत्यंतर इराक-अमेरिका, व्हिएतनाम या युध्दांमध्ये मिळते. अन्यत्रही याचे प्रत्यंतर येत आहेच.) संस्थांमधून आणि शासनामधून जे दोष किंवा जे रोग प्रकर्षाने दिसतात त्यांची मुळे तुमच्या-आमच्या हृदयात आहेत. ती आपल्या मनोवृत्तीचीच संतती आहे. हे ध्यानात आले तर, या सर्पप्रवृत्तीचे निर्मूलन करण्याचा यक्षप्रश्न हा मानवी मनोवृत्तीच्या परिवर्तनाचाच निकष आहे हे मान्य होण्यास अडचण पडू नये.'

अनेक भल्याभल्यांना अच्युतजी अध्यात्मात गुंग झाल्याची खात्री त्यांच्या या प्रकारच्या निष्कर्षात मिळते. पण वैयक्तिक मोक्षप्राप्तीच्या साधनेवर भर देणारे पारंपारिक अध्यात्म हे नाही. या पारंपारिक साधनेला उद्देशून 'व्यक्तिवादी अंहकाराचे पोषण' असा शब्दप्रयोग त्यांनी वापरला आहे.

अच्युतजींच्या मांडणीत एक साधे सत्य ग्रथित झालेले आहे. पक्ष, राजकारण, राज्यसत्ता, नियोजन, प्रकल्प, धोरणे, निर्बंध, कायदेकानू, शस्त्रास्त्रे, सैन्य, शासनयंत्रणा, विज्ञान-तंत्रविज्ञान, या व अशा सर्व गोष्टी ही कमी अधिक ताकदीची साधने माणसे वापरीत असतात, राबवीत असतात. ही साधने वापरणाऱ्या माणसांच्या मनोवृत्ती, प्रेरणा, निष्ठा, श्रेयकल्पना यांच्यावरच या साधनांचा वापर कसा केला जाणार व त्यांच्या द्वारे कोणते फळ पदरात पडणार हे दर पावलावर ठरणार. येथेही औपचारिक बौध्दिक पातळीवरून विचारप्रणालीचा केला जाणारा स्वीकार, घोषित केली जाणारी ध्येये-उद्दिष्टे आणि साक्षात माणसांचे वागणे यातले अंतरही आपल्या परिचयाचे आहे. एका पातळीवर आज आपण सर्व न्याय, समता, शोषणमुक्ती, मानवी अधिकार यांचा पक्ष घेणारेच आहोत. आणि तरीही सर्वांच्या प्राथमिक गरजा किमान पातळीवर भागविल्या जातील यांची व्यवस्था सतत लांबणीवरच पडत आहे.

निष्ठावान कर्तबगार, व्यावसायिक क्रांतिकारक क्रियाशील कार्यकर्त्यांच्या पक्षसंघटनेच्या ('काडर पार्टी') हाती सत्तेचे सूत्रकेंद्रीकरण राहिले, क्रांतिकारक वर्गाची अधिसत्ता कायम केली तर मनोवृत्ती व प्रेरणा-निष्ठा यांचा प्रश्न निकालात काढता येईल अशी आशा एका काळी बाळगली गेली होती. अशी हुकूमशाही ना सामान्य नागरिकांमध्ये सामाजिक शील उत्पन्न करू शकते ना क्रियाशील कार्यकर्त्यांचे सामाजिक शील भ्रष्ट होण्याचे रोखू शकते; किंबहुना, शील भ्रष्ट होण्यास अशी व्यवस्था सर्वांनाच प्रोत्साहन देते असा अनुभव पुनःपुन्हा येत आहे.

मानवमात्राविषयी करुणा, मनुष्यमात्राचे कल्याण ही जीवननिष्ठा; किंबहुना सर्व भूतमात्रांच्या हितामध्येच स्वतःचे हित आहे ही जाण माणसात बाहेरून शिस्त म्हणून न लादता कशी व कधी रुजते? आत्मकेंद्रितता, तीमधून जोपासली जाणारी सर्पप्रवृत्ती यांचे निराकरण कसे व केव्हा

माणसांच्या वैयक्तिक, संस्थात्मक आणि सामूहिक जीवनात एक सर्प-प्रवृत्ती आहे. आत्मकेंद्रित भावनेने ती सतत जोपासली जाते. तिचीच कराल- भीषण अभिव्यक्ती म्हणजे आजच्या जगातील आसुरी शस्त्रास्त्रसंभार आणि संहारक संघटना.

होते? अच्युतजी म्हणतात, 'प्रत्येक दुःखपर्यवसायी अनुभवाचा, वैद्य-रुग्णसदृश संबंधाच्या अनुरोधाने परामर्श घेतला की करुणेचा सहजपणे उद्भव होतो.'

ज्या समाजातील माणसे पुरेशा संख्येने व प्रमाणात निःस्वार्थी, निर्वैर, सर्वभूतहितैषी दृष्टी बाळगणारी, करुणेने प्रेरित होऊन परस्परांशी व्यवहार करण्याइतकी उन्नत बनणार नाहीत त्या समाजात न्याय, समता, शोषणमुक्ती यांचा आढळ केवळ संस्थात्मक रचना / व्यवस्था बदलल्याने होणार नाही.

गौतम बुध्दांच्या शिकवणुकीचा प्रसार भारतातील तरुण पिढीत व्हावा अशी अच्युतजींची अखेरच्या काही वर्षात तीव्र इच्छा या कारणाने होती. बुध्दांच्या शिकवणुकीकडे ते एक कर्मपंथ वा संप्रदाय म्हणून पहात नव्हते; त्या अर्थाने सर्व भारतीयांचे धर्मांतर त्यांना अभिप्रेत नव्हते.

गौतम बुध्दांनी सांगितलेले 'पंचशील' व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात रुजले नाही, जीवन व्यवहारांचा आधार बनले नाही तर भारताचा अभ्युदय अशक्य आहे; समाजात नाना कारणांनी कलह माजणार, वैरभाव पसरणार आणि

समाजाचे विघटन होणार, हे त्यांना स्पष्ट दिसत होते. (हे काळेकुट्ट भविष्य आपल्यालाही तर दिसू शकतेच.) समाजस्वास्थ्य बिघडले तर व्यक्तींच्या जीवनात सुख, शांती व समाधान यांचा लाभ होणार नाही हेही उघड आहे.

'पंचशील'ची मांडणी व्यक्तिगत संभाषणात त्यांनी एकदा पुढीलप्रमाणे केली:

१. अहिंसा, दुसऱ्याची हिंसा मी करणार नाही.
२. दुसऱ्याच्या पाशी जे आहे, जे त्याचे आहे ते मी हिसकावून घेणार नाही. लोभी वृत्तीने काही संपादन करणार नाही.
३. असत्य बोलणार नाही. असत्य वर्तन करणार नाही.
४. कामात खोटेपणा करणार नाही.
५. ज्या कोणत्या गोष्टींच्या सेवनामुळे मेंदूवर ताबा रहात नाही त्यांचे सेवन करणार नाही.

आता, पंडिती (अॅकेडेमिक) दृष्टीने ही मांडणी अपुरी वा सदोष असेलही. 'पंचशील'ची सकारात्मक विधायक मांडणीही करता येईल. अच्युतजींचा निर्देश कशाकडे आहे ते स्पष्ट आहे. अंतिमत: ज्या ज्या गोष्टींचे पर्यवसान व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर दु:खात, नाशात होते त्या त्या गोष्टींची पुष्टी करण्याकडेच आज सगळ्यांचा भर आहे. ज्यांना समाज बदलावयाचा आहे त्यांच्या स्वत:च्या समजुतींप्रमाणे ज्यांना उच्च ध्येये साध्य करावयाची आहेत ते देखील दु:खातच भर घालीत आहेत, विघटन-विनाश घडवून आणीत आहेत. ज्यामधून विकारांचा परिपोष होतो, ज्यामधून खोटेपणा वाढतो, आणि ज्यामधून माणसाचे 'अवधान' खंडित वा नष्ट होते त्या सर्व कृती-उक्ती अनिष्ट व व्यर्थ आहेत या निष्कर्षावर अच्युतजी आले होते. दु:खाचे मूळ शोधा, ते डोळसपणे पहा, ध्यानात घ्या आणि मुळातल्या त्या वृत्तींना खतपाणी मिळेल असा व्यवहार करण्यातून मुक्त- स्वतंत्र- व्हा, हीच बुध्द यांची शिकवण होती.

जातजमातवाद, धार्मिक सांप्रदायिकता, हिंदू संस्कृती व परंपरा यांचा दुराभिमान, इतिहासाचा चुकीचा गौरव या दोषांचा आरोप अच्युतजींवर कोणी करू शकणार नाही.

असे अच्युतजी भारतीयत्वाच्या गाभ्याशी असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण धर्मशीलतेची किंवा भारतीय संस्कृतीचे सारतत्व यांच्याविषयी बोलतात तेव्हा त्यात हिंदुत्ववाद वा अध्यात्म बघणे चुकीचे ठरते. ते काय म्हणत आहेत हे जाणून घेणे अगत्याचे ठरते.

१९८१ साली दिलेल्या चंद्रभानु गुप्ता स्मृती व्याख्यानात ते म्हणतात, "There was one religious stream in this country (India). Man worships what he fears. On this fear-based religion of the common people grew our hundreds of deities and temples demanding poojas and sacrificial offerings. On this tradition superimposed the insights and visions of few wise men who had pondered deeply on the destiny of man. The Vedic and the Upanishidic perspectives of the Unity of all Life brought inexpresible benediction. The Buddha spoke of sorrow and its causes— craving and attachment. Some mystics sang about an Energy which is incomprehensible, which is all pervading and inexpressible in words. These sages and wise men lived among common people and their vision merged with the popular tradition and patterns of belief. This more vital stream of the Formless Infinity has seeped out of the consciousness of millions of men who think they are religious."

(या देशात एकच धार्मिक प्रवाह होता. ज्याचं भय वाटतं त्याची मानव पूजा करतो. भयापोटी उद्भवलेल्या सामान्यजनांच्या या धर्मभावनेतूनच पूजा, सोपस्कार व बळींची मागणी करणाऱ्या आपल्या शेकडो देवता आणि देवळे यांची उत्पत्ती झाली. मानवाच्या भवितव्याविषयी ज्यांनी सखोल चिंतन केले आहे अशा काही मोजक्या व्यक्तींची अंतर्दृष्टी आणि दूरदृष्टी यांचा ठसा या परंपरेवर उमटला. वेद आणि उपनिषदे यामधील जीवनाच्या एकात्मतेच्या भूमिकेमुळे अपरंपार कल्याण घडून आलं. बुध्दाने दु:ख आणि दु:खामागची कारणं— आसक्ती व लोभ— यांचं विवेचन केलं. काही योग्यांनी एका अगम्य, सर्वव्यापी, अवर्णनीय अशा ऊर्जेची कवनं गायली. या ऋषीमुनींचं आणि ज्ञानी पुरुषांचं वास्तव्य सर्वसामान्य लोकांच्यातच होतं; त्यांची प्रज्ञा आणि लोकसमजुती यांचा संगम घडून आला. निराकार अनंताचा हा अतिजोमदार प्रवाहच स्वत:ला धार्मिक मानणाऱ्या लाखो जनांच्या जाणिवेमधून वाहतो आहे.)

भारतातील सामान्य माणूस, औपचारिकत: तो कोणत्याही धर्म, पंथ, वा संप्रदायाचा असो, या दोन्ही 'प्रवाहांचा' वारसदार आहे. आज विज्ञानही अनिर्वचनीय, अथांग, अनंत विराटाचे दर्शन घडवीत आहे, आणि धर्मदृष्टी व विज्ञानदृष्टी येथे एकत्र येतात असे म्हणून अच्युतजी पुढे म्हणतात, "You cannot hurt another without hurting yourself. This is a direct experience arising out of the glimpse of the Infinite. This is the source-spring of the religious feeling."

(स्वत:ला न दुखवता दुसऱ्याला दुखवणं शक्य नसतं. अनंताच्या दर्शनातून ही अनुभूती अगदी थेटपणे मिळते.

अर्क भावना इथेच उगम पावते.)

धर्मशीलतेची अशी स्पष्टता केल्यावर ते म्हणतात की भारतीय जीवनात तुंबलेपण आहे, अध:पतन आहे, ते सडत, विघटीत होते आहे, अस्थैर्य आहे पण तरीही हा वारसा भारतापाशी आहे. मानवी जीवनाला पावित्र्य आहे (sanctity) कारण ते 'अनंत' तत्वाचा एक अंश आहे. भारतीय पुनरुत्थानाच्या चक्रीय परिवर्तनाचा आरंभबिंदू या दृष्टीला पुन: जिवंत करणे हा आहे. अच्युतजी प्रश्न करतात, "Do we have the courage to face the fact that the root of our problem is that we have lost this anchorage of a religious mind? ....The religious mind alone is the begining of order in the midst of chaos."

(धार्मिक मनोवस्थेचा मूलाधार आपण गमावून बसलो आहोत हीच आपली खरी समस्या आहे ह्या वास्तवाला सामोरं जाण्याचं धैर्य आपल्यात आहे काय?... धर्मशीलता म्हणजेच अराजकामध्ये सुव्यवस्थेचा उद्भव.)

विश्वात ओतप्रोत असलेल्या अनिर्वचनीय, अथांग व अनंत चैतन्य तत्वाचेच आपण सर्व अंश आहोत, हे नाते आपणा सर्व भूतमात्रांमध्ये आहे हे एका अर्थी दैनंदिन, संसारी, व्यवहारी जगांच्या पलीकडील या अर्थाने 'पारलौकिक' आहे. या पारलौकिक सत्याच्या पार्श्वभूमीवर दैनंदिन संसारी जीवन हे अनित्य, क्षणिक, माया आहे. ही संतुलित सम्यक् समज ही माणसाच्या ठायी विवेक उत्पन्न करते, वैराग्यशील वृत्ती रुजविते, क्षमाशील बनविते, वासना-विकारांवर (इंद्रियांवर) काबू मिळविण्याची क्षमता उत्पन्न करते, (कशानेही न चळणारी) मन:शांती प्राप्त करून देते, दु:ख सोसण्याची अपार शक्ती देते, अनुभवातून येणारे प्रौढत्व अंगी बाणविते, श्रध्दा जोपासते ('सत्यमेव जयते' या स्वरुपाची), चित्तवृत्ती समाधानी बनते. म्हणजेच अच्युतजींना अभिप्रेत असलेल्या अर्थाने स्वतंत्र व मुक्त बनविते.

वरकरणी हे संसारी जगाकडे पाठ फिरवायला शिकवणारे 'निवृत्तीपर अध्यात्म' आहे असे भासते. पण ज्या आत्मकेंद्रिततेतून सुटका झाल्याखेरीज न्याय्य, समान, बंधुभावावर अधिष्ठित समाज निर्माण होऊ शकत नाही असे अच्युतजींनी म्हटले त्या आत्मकेंद्रिततेपासून मुक्त करणारे हे 'अध्यात्म' नवसमाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

१२

धार्मिक भाविकतेचा, पूर्वग्रहांचा, समजुतींचा राजकारणासाठी वापर करून घेण्याची प्रवृत्ती आज प्रकर्षाने पावत आहे. 'खऱ्या' व 'खोट्या' सेक्युलरिझमची भाषा केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, या संदर्भात अच्युतजींची भूमिका काय होती ते पाहणे इष्ट व उपयोगाचे होईल.

१९६७ साली श्री अ.भि. शाह यांच्या पुढाकाराने 'इंडियन सेक्युलर फोरम' (पुढे 'सोसायटी')ची स्थापना झाली. स्थापना परिषदेतले 'प्रवर्तक' (Keynote) भाषण अच्युतजींनी दिले होते. जातजमातीय, धार्मिक-राजकीय, प्रादेशिक व भाषिक निष्ठा व आकांक्षा स्वातंत्र्योत्तर भारतात लोप पावतील आणि एका विशाल भारतीय राष्ट्रनिष्ठेत विसर्जित होतील ही उराशी बाळगलेली आशा विफल ठरली, असे म्हणण्यापासून अच्युतजींनी सुरूवात केली. राजकीय-शासकीय व्यवहारांच्या बाबतीत 'सेक्युलर'ची एका व्याख्याच अप्रत्यक्षपणे येथे अच्युतजींनी केली आहे. ही व्याख्या धर्मनिष्ठ अलगतावादी भूमिकेपुरती सेक्युलर हा शब्द मर्यादित करीत नाही. राजकारणी फुटीरतेसाठी जेव्हा जेव्हा राष्ट्रस्तराहून निम्नस्तरीय निष्ठा, भावना, अस्मिता वा आकांक्षा यांचा वापर केला जाईल तेव्हा तेव्हा ह्यांचा अवैध व गैर-सेक्युलर वापर केला जात आहे असे प्रतिपादन आहे. या कसोटीवर आज भारतात चाललेल्या राजकारणापैकी जवळपास १०० टक्के राजकारण सेक्युलर नाही अशा निष्कर्षाला यावे लागेल हे ध्यानात घेण्यासारखे आहे.

हिंदू-मुस्लिम तणाव व कलह ही ब्रिटिश राजनीतीच्या कुटील 'फोडा आणि झोडा' या धोरणाची निर्मिती होती, व ब्रिटिश राजवटीपूर्वी या दोन जमातींमध्ये सख्य होते हा आपला गैरसमज होता, याची कबुली अच्युतजींनी दिली. आणखी एका गैरसमजाची कबुली त्यांनी दिली. लोकशाहीच्या प्रस्थापनेमुळे जाती-जातींमधील व स्पृश्यास्पृश्यांमधील तणाव संपुष्टात येतील असे आपण समजलो होतो असे म्हणून ते म्हणतात, "I had a robust faith that full civic equality of all citizens irrespective of caste, creed or sex would automatically become a fact in the course of years with the support of the state power."

(येत्या काही वर्षांत शासनसंस्थेच्या आधाराने धर्म, वंश, लिंग ह्या भेदांना बाजूला सारून सर्व नागरिकांमध्ये पूर्ण समता स्थापन होईल अशी माझी दृढ श्रध्दा होती.)

अस्पृश्यतेचे प्रत्यक्ष व्यवहारात पूर्ण उच्चाटन झाल्याची खात्री पटविल्यावरच भारताला स्वातंत्र्य प्रदान करणे योग्य होईल असे डॉ. आंबेडकर म्हणायचे त्याकडे अधिक गंभीरपणे ध्यान द्यायला हवे होते असे अच्युतजींनी म्हटले.

भारतीय राष्ट्र सेक्युलर राहील असे घोषित केल्याबद्दल काही लोक नाराजी व्यक्त करतात; जडवाद व अधर्म यांना दार खुले करणारी ही गोष्ट असून, त्यामुळे भारतीय समाजाचे नैतिक अधिष्ठान उखडले जाईल, अशी त्यांची टीका असते, याची नोंद घेऊन अच्युतजी म्हणतात की

'धर्म' या शब्दाचा अर्थ लावण्यातला हा घोटाळा आहे. भारतीय राज्यघटनेला नैतिक तत्वे व मूल्ये यांची बैठक आहेच; प्रत्येक व्यक्तीचे काही मूलभूत हक्क आहेत हे ती स्वीकारते. फरक हा आहे की, यासाठी कोणत्याही विशिष्ट धर्माचे वा धर्मग्रंथाचे प्रामाण्य भारतीय राज्यघटना मान्य करीत नाही. कोणतीही सामाजिक अन्यायाची, शोषणाची गोष्ट वा कृती धार्मिक अधिसत्तेच्या वा ग्रांथिक प्रामाण्याच्या वा फतव्याच्या आड संरक्षण मिळवू शकत नाही. भारतीय न्यायालये व कायदेकानू धार्मिक अधिसत्ता व धर्मग्रंथांचे प्रामाण्य स्वीकारत नाहीत. राज्य सेक्युलर असण्याचा हा स्पष्ट अर्थ आहे असे अच्युतजी म्हणतात. समाजधारक मानवीय मूल्ये व नीतितत्वे हा 'धर्माच्या अधिष्ठाना'चा आशय मानला तर भारतीय राष्ट्रही धर्माधिष्ठित आहे असे म्हणता येईल. भिन्न भिन्न धर्मांमधील विशिष्ट रूढी-परंपरा आणि धर्मग्रंथांमधील वचने वा आदेश आणि समाज व मानव यांचे कल्याण यांच्यात विसंवाद व विरोध उत्पन्न होईल तेव्हा धर्मग्रंथ व धर्माचार्य यांनी संमत केलेल्या

सेक्युलर असणे म्हणजे धर्मांच्या विरोधात जडवादी भूमिका अंगिकारणे नव्हे, तर चिरंतन नीतितत्वे व मूल्ये यांच्या पालनासाठी काल व परिस्थितीनुसार अनुरूप सुधारणा करीत जाणे. अच्युतजींनी केलेला हा अर्थ अधिक नेमका व समंजस आहे.

आचारधर्म, कर्मकांड, विधी यांच्यात बदल करणे आवश्यक असते. सेक्युलर असणे म्हणजे धर्मांच्या विरोधात जडवादी भूमिका अंगिकारणे नव्हे, तर चिरंतन नीतितत्वे व मूल्ये यांच्या पालनासाठी काल व परिस्थितीनुसार अनुरूप सुधारणा करीत जाणे. अच्युतजींनी केलेला हा अर्थ अधिक नेमका व समंजस आहे. धर्मश्रध्दा व धर्माचरण यांचे सतत परिष्करण, उन्नयन करीत राहण्यावर यात भर येतो.

आपल्या भाषणात त्यांनी दिलेला एक इशारा फार महत्वाचा आहे. ते म्हणतात, "...man must be recognised to be endowed with an inborn religious urge... Like the aesthetic urge, the religious urge is the source of some of the finest sentiments of the human heart. It is a door of perception which reveals in a flash something which fills human life with sanctity. It is the direct glimpse of the immeasurable ....in the heart of man is the source compassion."

... (धार्मिक प्रेरणा मानवामध्ये उपजतच असते हे मान्य करणे आवश्यक आहे... सौंदर्यप्रेरणेप्रमाणेच धर्मप्रेरणादेखील मानवाच्या अंतरंगात उदात्त भाव निर्माण करू शकते. अनुभूतीच्या या कवाडामधून निमिषमात्र घडणाऱ्या तेजोमय दर्शनातून मानवी जीवनाचं अधिष्ठानच गवसतं... हे दर्शन म्हणजे अनंताचा साक्षात्कारच होय... माणसाच्या अंतरंगातंच ह्या निखळ करुणेचा उगम असतो.)

सामाजिक शील उत्पन्न करण्याच्या संदर्भात अच्युतजींच्या या विचारांचा परिचय आपण करून घेतला आहेच.

त्यांच्या या उद्‌गारांचे मर्म आणखीही एका अंगाने जाणून घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने निधनापूर्वी काही दिवस 'सेक्युलरिझम अँड द रिलिज़स माईंड' या नावाचा त्यांचा 'जनता' या इंग्रजी साप्ताहिकात प्रसिध्द झालेला लेखही उपयोगी आहे. (२४ वर्षांचे अंतर वर उल्लेखिलेल्या भाषणात व या लेखात असूनही विचार तोच कायम राहिला आहे, ही गोष्ट लक्षणीय आहे.)

'भारत हे राष्ट्र (पाकिस्तानप्रमाणे) कोणत्याही एका विवक्षित (संघटित) धर्मावर अधिष्ठित नाही; भारतीय राज्यघटना भारतातील सर्व धर्मांचा समानत्वाने स्वीकार करते, व त्या धर्मांच्या अनुयायांच्या दृष्टीने ते पवित्र आहेत ही गोष्ट स्वीकारते. सत्य तेच एक असते, त्याचा आविष्कार लोक वेगवेगळा करतात ('एकं सत् विप्रः बहुधा वदन्ति') ही भारतीय संस्कृतीची दृष्टी राज्यघटनेत प्रतिबिंबित झालेली आढळते.' आजच्या भारताच्या परिस्थितीमध्ये 'सेक्युलरिझम'चा हाच अर्थ योग्य आहे, याच अर्थाने हा शब्द वापरणे प्रस्तुत आहे, असे अच्युतजींनी म्हटले आहे.

'ओम् तत् सत्' म्हणजे 'ब्रह्मन्', आणि 'ब्रह्मन्' चा अर्थ, कधी क्षय पावत नाही (non-entropic) असे चैतन्य, जे अगणित रूपांमध्ये सतत पुनःपुन्हा नवनवोन्मेषशाली स्वरूपात आविष्कृत होत रहाते; ही रूपे जन्मतात, वाढतात व मृत्यू पावतात. सर्व प्रकट आविष्कृत जीवन अनित्य असते, केवल एका ब्रह्मन् चे अस्तित्व अनादी अनंत, व नित्य असते. ही मूलगामी हिंदू मांडणी आहे. स्वतःला हिंदू म्हणविणारा कोणताच प्रवाह ही उन्नत, उदार, विशाल दृष्टी, भूमिका नाकारू शकत नाही. ही भूमिका सहजपणे सर्व विभिन्न कर्मांना, दर्शनांना सामावून घेऊ शकते. ईश्वराचे अस्तित्व मानणे हिंदू धर्मशील मनाचे व्यवच्छेदक लक्षण नाही. या मांडणीच्या आधारे अच्युतजी आपला मुख्य मुद्दा करतात.

आपण सर्वच चैतन्यस्वरूपी या अनादी-अनंत परमात्म्याचे अंश आहोत, या अर्थाने अन्योन्याश्रयी आहोत, एकच आहोत आणि प्रत्येक जीव हा तेवढाच पवित्र आहे,

...ची हत्या करणे पाप आहे हे तत्वज्ञान सर्व भारतभर सर्व थरातल्या माणसांच्या 'हिंदू' मानसात मुरलेले आहे. ते केवळ पुस्तकात राहिलेले नाही. खेडवळ, निरक्षर सामान्य माणसाच्या मनाच्या अगदी आतल्या कंदापर्यंत ते मुरले आहे. या चैतन्यतत्वाची, 'जगदीशाची' कोणत्याही लौकिक रूपात वा अवतारात पूजा माणूस करू शकतो, अविद्येच्या बंधनातून मुक्त होण्याचे एकाहून जास्त मार्ग त्याला उपलब्ध आहेत हे 'हिंदू' मन सहजपणे स्वीकारते. एका बाजूला, ज्या मनाचे हे अधिष्ठान सुटले ते मन हिंदू म्हणवून घ्यावयास पात्र नाही असे अच्युतजींना अभिप्रेत आहे. दुसरीकडे, त्यांना असेही म्हणायचे आहे की, हे 'हिंदू' मानस सहिष्णु व सर्वसमावेशक असल्याने 'सेक्युलर' राज्याची उभारणी करण्यासाठी हाच पाया आदर्श आहे.

व्यवहारात जातीय, जमातीय वा धार्मिक-सांप्रदायिक स्वरूपाचे वाद उपस्थित होतात, कलह माजतात, दंगली उसळतात. त्यांची सोडवणूक व्हावी म्हणून, वा ते उपस्थितच होऊ नयेत म्हणून भारतीय संस्कृतीच्या अगदी गाभ्याशी वा मुळाशी असलेली ही धर्मशीलताच अव्हेरणे अयोग्य व घातक होईल असे त्यांचे म्हणणे होते. हे वैशिष्ट्यपूर्ण धर्मशील मानस हे या भूमीचे सामर्थ्यस्थळ राहिले आहे. नाना वंशांचे, धर्मांचे आक्रमक समुदाय भारतावर चालून आले, जेते बनून त्यांनी आपली राज्ये-साम्राज्ये स्थापन केली. पण काही पिढ्यांच्या अवधीत त्यांचेच बाह्यांग व अंतरंग बदलून गेले. काही समुदाय आश्रयाला आले, त्यांनाही येथे त्यांचे धर्म न सोडावे लागता आपलेसे केले गेले.

'हिंदू' या शब्दाला न बिचकता, उलट त्याचा योग्य आदर करीत, मात्र त्याच वेळी हिंदू धर्मशील मानसाचे अलौकिक वैशिष्ट्य स्पष्ट करीत अच्युतजींनी 'सेक्युलर' या शब्दालाच भारताच्या संदर्भात स्थलकालोचित असा आशय प्राप्त करून दिला आहे. दुसरीकडे त्यांनी भारतीय राज्यघटना व राज्य कोणत्या अर्थाने सेक्युलर आहे तेही स्पष्ट केले आहे.

कोणत्याही धर्माच्या नावाने चालणाऱ्या वेडगावाकड्या गोष्टींना या भूमिकेचे संरक्षण वा आश्रय मिळू शकत नाही. मृत्यूपूर्वी काही दिवस लिहिलेल्या लेखात त्यांनी दिल्ली येथील जामिया मिलिया विद्यापिठाचे प्र-कुलगुरु मुशिरूल हसन यांच्या विरुध्द जे काहूर माजविले गेले त्याचे अत्यंत कठोर शब्दांमध्ये खंडन केले आहे. रामजन्मभूमीचे राजकारण करणाऱ्यांची तर त्यांनी जास्त तिखटपणे निर्भत्सना केली. पण असे करीत असताना रूढार्थाने निधर्मी, डावी, पुरोगामी भूमिका ते घेत नाहीत. भारतात इस्लामची एक उदार परंपरा विकास पावली होती, आणि जामिया मिलिया हे तिचे एक केंद्र होते. हिंदू धर्मशील मानसाच्या सहिष्णु व सर्वसमावेशक प्रभावाखाली उन्नयन पावत असलेल्या इस्लामच्या प्रवाहाला बळकटी आणण्याचे महत्व ते आपल्या लेखात प्रतिपादतात. रामजन्मभूमीचे राजकारण, समाजकारण व धर्मकारण करणाऱ्यांना तर, तुम्ही स्वत:ला उद्देशून 'हिंदू' हा शब्द तरी खरे तर वापरू शकता का, कारण या भूमीचे अत्यंत मौलिक गुणवैशिष्ट्य व संपदा असलेली धर्मशीलताच तुम्ही उखडता आहात, नाही का, असा खडा सवाल त्यांनी केला असता. देव दगडी मूर्तीत व मंदिरात नाही, तो सर्वत्र चराचरसृष्टी व्यापून दशांगुले उरणारा आहे, अशी शिकवण मुरलेल्या लोकांचा देव अमूक जागी उभारलेल्या मंदिरात कैद करण्याची गोष्ट करून या लोकांचा आत्मा नष्ट करीत आहात, असे त्यांनी म्हटले असते.

माणसाच्या अंतरात वास करीत असलेल्या सनातन धर्मशील मानसावर उभारलेला सेक्युलर समाज व संस्कृती! 'हिंदू' संस्कृती, परंपरा, इतिहास, विचार यांचा वृथा अभिमान कणभरही नाही, पण हिंदू या शब्दाला बिथरून उचित श्रेय पदरात टाकण्यात पाऊल मागे पण नाही. दैनंदिन व्यवहारात उपस्थित होण्याऱ्या कोणत्याही समस्येला वा पेचप्रसंगाला यात बगल नाही. उलट प्रत्येक प्रासंगिक समस्या अधिक नीटपणे, हितकारक पध्दतीने व लाभदायी स्वरूपात जिच्या आधारे सुटू शकते अशी ही भूमिका आहे.

१३

समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात राज्यसत्तेची पोच, हस्तक्षेप, नियंत्रण-नियमन ही समाजवादाच्या उभारणीसाठी आवश्यक व इष्ट गोष्ट आहे या मान्यतेपासून अच्युतजींच्या राजकीय भूमिकेची सुरवात झाली, पण देशातल्या व जगभरच्या अनुभवापासून बोध घेऊन त्यांनी आपली भूमिका बदलली. नवसमाजाची उभारणी राज्यसत्ता करू शकत नाही; विशेषत; न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुभाव या मूल्यांवर अधिष्ठित समाजाची. माणसाचे सर्व जीवन हे मोठ्या संस्था/यंत्रणा आपसात विभागून घेऊन, शास्त्रशुध्द व प्रगत व आधुनिक पायांवर त्या त्या अंगाची सुव्यवस्था लावण्याचे उद्दिष्ट सांगून माणसांचा ताबा या संस्था/यंत्रणा घेत आहेत. राज्यसत्ता ही यातली सर्वात मोठी संस्था होय. पण या सर्व संस्था/यंत्रणांचा स्वभावच हा आहे की सत्ता नोकरशहा वा चालक मंडळी यांच्या हाती केंद्रित होते आणि माणसे सत्ताहीन परावलंबी, निस्त्राण होत जातात. राज्यसत्तेसकट सर्व संस्था/यंत्रणा यांच्या जंजाळामधून, जोखडाखालून मुक्ती मिळवणे अगत्याचे झाले आहे. हे भान तीव्र झाल्यावर अच्युतजी महात्मा गांधीच्या जवळ आलेले दिसतात.



राज्यसत्ता संपादन करण्याच्या राजकारणातला त्यांचा रस शून्य झाला. स्वायत्त लोकशक्तीचे जागरण, संघटन व प्रकटन विधायक स्वरूपात करण्यावरील भर वाढला. शहरीकरण, औद्योगीकरण, आधुनिकीकरण, विज्ञान-तंत्रविज्ञानाच्या करामती आणि या सगळ्यामधून वाढत चाललेले, सर्वंकष बनत चाललेले यांत्रिकीकरण यांनी अच्युतजी व्यथित झाले. त्यात खेड्यापाड्यातील दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांची व खेड्यांमधली पायाभूत संसाधनांची उपेक्षा त्यांना जास्त जास्त बोचू लागली. हे वैचारिक परिवर्तन त्यांच्या १९७६ सालच्या सेनापती बापट स्मृति व्याख्यानांमध्ये स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेले आढळते. ते म्हणतात, '...आधुनिक उत्पादन तंत्राचे स्वरूप जरा बारकाईने पाहिले, तर असे दिसून येते की या पध्दतीतून अनेक तऱ्हेचे परस्परसंबद्ध परिणाम अटळपणे निर्माण झालेले आहेत. यंत्रोत्पादनाचा पसारा अवाढव्य झाला आहे. समाजजीवनात अनेकविध संस्थांचा प्रपंच उभा राहिला आहे.' '...विसाव्या शतकाच्या अखेरच्या चरणात माणसाचे तथाकथित स्वातंत्र्य हे सर्वतोपरी या विविध संस्थांच्या जाळ्यातच गुंतलेले आहे व या प्रक्रियेची सावधपणे जाणीव होण्यातच माणसाच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.'

नंतरच्या काळात त्यांची ही धारणा अधिकाधिक दृढ होत गेली असली पाहिजे. १९४२च्या ऑगस्ट क्रांतीला पन्नास वर्षे झाल्याच्या प्रसंगी त्यांनी लिहिलेला लेख 'साधना' साप्ताहिकाच्या श्रध्दांजली विशेषांकात त्यांच्या निधनानंतर प्रसिध्द झाला. या लेखात बेचाळीसच्या क्रांतीमागील दृष्टी व सूत्र त्यांनी नेहमीपेक्षा अगदी वेगळ्या पध्दतीने स्पष्ट केले. ही स्पष्टता त्यांच्या मनची नव्हती; ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी केलेल्या भाषणाचा, लेखनाचा आधार त्याला आहे. महत्व आहे ते अच्युतजींनी त्यांना दिलेल्या उजाळ्याचे.

भारतीय जनतेचे पारंपारिक मानस राज्य: क्षत्रिय राजघराण्यांनी व तत्सम परकीय समूहांनी करावयाचे, प्रभुसत्ता त्यांची असणेच उचित, असे होते. या संकल्पनेत क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचे, जनतेला आत्मशक्तीचा साक्षात्कार घडविण्याचे कार्य ऑगस्ट क्रांतीने पार पाडले, ते तिचे मुख्य यश असे अच्युतजी म्हणतात.

जनतेची आत्मशक्ती किंवा लोकशक्ती जागृत, क्रियाशील, समर्थ व परिणामकारक करण्याची आत्यंतिक निकड त्यांना जाणवत असल्याचे त्यांनी म्हटले. या संदर्भात ते म्हणतात, 'गांधीजींची राज्यसत्तेविषयक संकल्पना आज कितीही अव्यवहार्य दिसत असली तरी त्यांच्या भूमिकेतील तथ्य ध्यानी घेण्याची गरज आहे. दंडशक्तीचा सर्वात कमी वापर करणारे शासन हे सर्वोत्तम शासन हा त्यांचा दृष्टीकोन जनतेच्या स्वंयभू आत्मनिर्भरतेला आव्हान आहे.'

शासनाकडे मागण्या करण्याचे तथाकथित लढाऊ राजकारण, हक्कांसाठी संघर्षात्मक कृती/आंदोलने, अलग राहून स्वत:च्या जाती जमातींचे केलेले राजकारण या सर्वांवरील त्यांचा विश्वास बराचसा उडाला होता. जनसामान्यांचा विधायक पुरुषार्थ स्वत:च्या निकडीच्या आर्थिक, सामाजिक व नैतिक समस्या सोडविण्यासाठी जागृत करण्याचे महत्व जाणवून त्यांनी आपल्या शेवटच्या लेखात असा एक कार्यक्रमच समोर ठेवला.

खेड्यांच्या नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, शेतीचा कायापालट, समुचित तंत्रज्ञानाच्या सहाय्याने खेड्यांमधील लोकांना गावोगाव रोजगार देणाऱ्या, ग्रामीण कच्च्या मालाचा उपयोग करणाऱ्या उद्योगांची उभारणी आणि हे कार्य पार पाडणाऱ्या विकेंद्रित स्वयंसेवी संस्थांचे देशव्यापी जाळे, असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. तरुणांच्या ध्येयवादाला, कौशल्याला, कर्तृत्वाला आव्हान तसेच वावही देणारा हा कार्यक्रम आहे. खेड्यांच्या पुनरुत्थानाच्या गांधीप्रणीत कार्यक्रमाच्या बऱ्याच जवळ येणारा हा कार्यक्रम आहे.

याला जोडून एक पूरक असा तीन कलमी कार्यक्रमही अच्युतजींनी पुढे ठेवला. समाजवादी चळवळीतील निवडक मंडळींसमोरही त्यांनी हा कार्यक्रम राबविण्याचे आवाहन केले. संपूर्ण साक्षरता, बायोगॅस संयंत्रे व सुलभ शौचालयांवर आधारित संपूर्ण ग्रामसफाई आणि कडक संततिनियमन असा हा तीन कलमी कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमाच्या बाबतीत अच्युतजींनी एक पथ्य सांगितले आहे. ते म्हणतात, 'पंचायतीपासून ते राज्यपातळीपर्यंत सर्व शासकीय संस्थांच्या पासून हे कार्य अलिप्त ठेवले तरच ते निकोपपणे वाढू शकेल'... 'त्यांच्यावर (राजकीय पक्षांवर), त्यांच्या मदतीवर अवलंबून राहण्यात किंवा त्यांच्या हाती या स्वंयसेवी संघटना देण्यात या कार्याच्या विकासाला धोका आहे हे नमूद केले पाहिजे.'

कोणत्या वृत्तीने या कार्यात हात घातला पाहिजे? अच्युतजी म्हणतात, 'पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांना खुले करण्यासाठी ज्या भक्तिभावाने साने गुरुजींनी आंदोलन छेडले त्याच भक्तिभावाने आजच्या अवनत राजकीय परिस्थितीत अशा कार्याला सुरूवात करावी लागेल.' हा भक्तिभाव कोणासाठी तर जनताजनार्दनासाठी आणि कशासाठी, तर, लोकशक्ती जागृत व क्रियाशील करून आत्मशक्तीचा प्रत्यय जनताजनार्दनाला आणून देण्यासाठी.

१४

राजकारण, राजकीय व्यवहार व राज्यकारभार यांची शुध्दता, त्यांचे स्वास्थ्य (निकोपपण) सतत टिकवून ठेवावे लागते. कारण यात सत्तासंपादन, तिचा वापर या गोष्टी अंगभूत असतात, ''पॉवर करप्ट्स अँड ॲबसोल्यूट पॉवर करप्ट्स ॲबसोल्यूटली' हे वचन सार्थच आहे. राजकारण, राजकीय जीवन व व्यवहार यांचे महत्व जाणणारी, त्र ी चांगली समज असणारी, पण सत्ताकांक्षेपासून मुक्त असलेली, त्या अर्थाने विरक्त व तटस्थ असलेली, 'राजकीय यती' म्हणून कार्य करणारी माणसे समाजात असायला लागतात अशी मांडणी आचार्य जावडेकर यांनी केली होती. श्री यदुनाथ थत्ते यांनी अच्युतजी हे 'राजकीय यती'च्या भूमिकेच्या जवळ पोचले होते असे म्हटले, ते सार्थ आहे.

लोकप्रियतेच्या शिखरावर पोचून, यश, कीर्ती व गौरव यांच्या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या अच्युतजींनी जाणीवपूर्वक 'आत्मविलोपना'ची, म्हणजे अनामिक बनण्याची साधना केली, व तीत आपण बव्हंशी सफल झालो हे समाधानही मिळवले. यतिधर्माला साजेशीच ही गोष्ट होती.

लोकशाही समाजवादी विचारांच्या मंडळींनी आणखी एका अंगानेही अच्युतजींच्या व्यक्तित्वाच्या व विचारांच्या उमलत जाण्यापासून बोध घ्यायला हवा आहे. पक्षीय राजकारण सोडले तरी समाजवादी निष्ठा त्यांची कायम होती. भारतीय समाजस्थिती, जगातल्या घडामोडी, विज्ञानाची रुंदावणारी क्षितिजे यांच्या परिप्रेक्ष्यात १९४७ नंतरची पंचेचाळीस वर्षे त्यांनी समाजवादाच्या आशयाचा, समाजवादी समाजाच्या निर्मितीच्या प्रक्रियेचा सतत पुनर्विचार केला. व्यक्तिगत जीवनात, पारंपारिक अर्थाने नाही तरी कृष्णमूर्तींच्या अर्थाने तरी खचितच, 'मुक्त' होण्यात, 'मोक्षा'ची साधना करण्यात त्यांना रस होताच. पण समाजाच्या पुनरुत्थानाची चिंता त्यांना सतत होती. दारिद्र्य मिटावे, शोषण-अन्याय यांचे निराकरण व्हावे, जातीय-जमातीय- सांप्रदायिक- भाषिक- प्रादेशिक- वांशिक निष्ठांपासून मुक्त होऊन माणसांची मने विशाल व्हावीत, आर्थिक समतेच्या इतकीच, कांकणभर जास्तच, सामाजिक समता व्यवहारात अस्तित्वात यावी, भौतिकदृष्ट्या समृध्द जीवन सर्वांना लाभावे असे त्यांचे स्वप्न होते. पण ते दिवसेदिवस जास्त जास्त असाध्य बनत चाललेले पाहून साऱ्या गोष्टींचा मुळातून फेरविचार करायला ते प्रवृत्त झाले.

पाश्चात्यांना अनुसरून, मग ते फेबियन समाजवादी असोत की मार्क्सवादी- साम्यवादी असोत, १९३०-४० या कालखंडात स्वीकारलेली लोकशाही समाजवादाची रूढ मांडणी त्यांना अखेरीस बव्हंशी त्याज्य वाटली. महात्मा गांधींच्या भूमिकेशी, विचारांशी त्यांचे मतभेद काही प्रमाणात शिल्लक राहिले, पण गांधीजींच्या भूमिकेच्या फार जवळ ते येऊन पोचले.

सामाजिक शीलाचे एकमेव खरे अधिष्ठान असलेली, माणसाच्या अगदी गाभ्याशी असलेली धर्मशीलता, वैशिष्ट्यपूर्ण 'हिंदू' धर्मशील मानस व वृत्ती, या भारतभूमीचे संस्कृती-तत्व (ethics) यांच्या पायावर येथील साधू-संतांनी, ऋषि-मुनींनी फकीर-बैराग्यांनी, महात्म्यांनी घडविलेल्या जनसामान्यांच्या मनोधारणा, मान्यता व वृत्ती यांच्या सहाय्यानेच लोकशाही समाजवाद या देशात मूर्त होऊ शकेल ही त्यांची श्रध्दा होती.

शासनव्यवहार, अर्थकारण, तंत्रविज्ञान, संस्थात्मक रचना अशा विविध अंगांच्या संदर्भात त्यांनी स्वायत्त, आत्मनिर्भर विकेंद्रीकरणाची उत्तरोत्तर अधिकाधिक पुष्टी केली. याही अंगाने त्यांनी लोकशाही समाजवादाचे 'देशीकरण' केले असे म्हणता येईल.

अच्युतजींनी यतिधर्माचे चोख पालन केले. अखेरच्या क्षणी आपण होऊन त्यांनी या देशातील त्यांच्या आप्तस्वकीय समाजवादी (व बिगर समाजवादीही) मंडळींशी संवाद साधला. त्यांनी हाती ठेलेल्या वारशाचे काय करायचे हे, तसे म्हटले तर, आता आपल्याच हाती आहे.

●●●